स्वादमय सेवेचा • राजस्थानी थाळी •
स्वादिष्ट.. रुचकर
भोजनाचा आस्वाद घ्या..

लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर फोन: 2327060, 9850799850


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

गोड गोड हुरडा
गरम गरम वनभोजन
सहकुटुंब मित्रपरिवारासह
निसर्गाचा
मनमुराद आनंद घेऊया
२५ पेक्षाही अधिक
मनोरंजनाची साधने व
इतर बरेच काही
संपूर्ण परिवारासह
साईबनमध्ये
हुरडा पार्टी
आकर्षक पॅकेज उपलब्ध
आजच संपर्क करा
साईबन
साईबन कृषी पर्यटन केंद्र,
एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. १३.१२.२०२४ | अंक नं. २३९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

गुलाटी मोटर्स
ASHOK LEYLAND
Koi Manzil Door Nahin
95000/-* पर्यंत चा फायदा..!
त्वरा करा! किंमती वाढण्याआधी खरेदी करा!*
आता जुन्या किंमतीत खरेदी करा! शेवटची संधी!!
डिसेंबर धमाका ऑफर
30 डिसेंबर 2024 पर्यंत वैध.

DOST XL — पेलोड 1400 किलो
BADA DOST — पेलोड 2125 किलो पर्यंत
DOST+ — पेलोड 1500 किलो
FIRST IN INDUSTRY 5 Years or 2 Lakh km. WARRANTY
किंमत वाढीचा इशारा!
जुन्या किंमतीचा लाभ*
खास एक्सचेंज बोनस*
कमी डाऊन पेमेंट*
अधिक माहिती करिता संपर्क
9130090039 | 9130090015
HINDUJA GROUP

आपके शहर में पहली बार
भारतीय क्राफ्ट उत्सव
३ डिसेंबरपासून सुरू..

खास आकर्षण
लखनवी चिकन सुट • सहारनपुर फर्नीचर • राजस्थानी बांगड्या • राजस्थानी पेंटिंग्स् • बनारसी साड्या • पश्चिम बंगाल साड्या • चंदेरी सिल्क साड्या • बेड कव्हर्स • दिवान सेट • केरळ ज्वेलरी • सतरंजी • मोजडी • फॅन्सी चप्पल • लेदर बॅग्स् • टॉप्स • टी-शर्टस् • कारपेट • पंजाबी सुट • मंगलगिरी ड्रेस मटेरिअल्स • जयपुरी जूती • ब्लॉक प्रिंट • खुर्जा क्रॉकरी • टेराकोटा वगैरे
विविध प्रकारच्या हॅन्डीक्राफ्ट व हॅन्डलूम बनावटीच्या वस्तु सवलतीच्या दरात खरेदी करण्याची
सुवर्ण संधी !
मोफत प्रवेश व पार्किंग
स्थळ - तांबटकर माळा ग्राउंड
पारिजात कॉर्नर चौक, गुलमोहर रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)
वेळ: सकाळी 10.30 ते रात्री 10.00 पर्यंत

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Admissions Open
St. Michael's School
NARAYANDOHO
For STD : 1,2,3,5,6,8
Forms available on 16th 17th 18th Dec 24
(Timing : 10 am To 1 pm.)
School Office On Sholapur Road,Ahmednagar
Ph : 0241-2321529

व्यवसायाची सुवर्णसंधी
सिध्दीबागेसमोर रोडटच, न्यू लॉ कॉलेजरोड भव्य गाळे सर्व सोयी-सुविधांयुक्त भाडेतत्वावर देणे आहे.
- संपर्क -
Mo. 9270570699

॥ ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः ॐ ॥ ॥ ॐ नमो भगवते श्री शंकर सद्गुरू राया ॥
॥ मुझे वही जानता है, जो खुदको समझता है ॥


मुझे वही जानता है, जो खुदको समझता है ।
श्री दत्त जयंती उत्सव
सद्गुरू कृपांकित भाविक-भक्तांनो सालाबादप्रमाणे याही वर्षी
शनिवार दि.१४/१२/२०२४ रोजी श्री दत्त जयंती उत्सव सोहळासाजरा होणार आहे.
सद्गुरूंच्या दर्शन सोहळ्याचा लाभ घ्यावा
ही मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने नम्र विनंती.
- कार्यक्रमाची रूपरेषा -
सकाळी ९.०० ते १०.३० - श्री चा महाभिषेक
दुपारी १२.०० ते १.०० - श्री ची महाआरती व श्रींचा पाळणा
दुपारी १.०० ते २.०० - श्री चा पालखी सोहळा तद्नंतर महाप्रसाद, दर्शन सोहळा व भजन
- आपले विनित -
मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट)
श्री विश्वेश्वर स्वामी महाराज
(श्री राजाभाऊ कोठारी)

मंगल दत्त क्षेत्र, एफ-७०, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर
टिप : कृपया पुष्पगुच्छ आणु नये त्याऐवजी अन्नदान व वैद्यकीय सेवेत सहभाग नोंदवावा !

TVS iQUBE ELECTRIC
TVS

TVS iQube Midnight Carnival
1 WINNER EVERYDAY
STAND A CHANCE TO WIN
100%* CASHBACK
ASSURED CASHBACK UP TO ₹ 30000*
12 MONTHS NO COST EMI
FREE 5 YEARS / 70 000 KM* EXTENDED WARRANTY
12TH TO 22ND DECEMBER
शिवम TVS
माऊली संकुल समोर, सावेडी रोड, अहमदनगर 414003
9130030002 / 9130030005 / 7796685500
*T&C APPLY

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## दत्त दिगंबर – दैवत माझे...

मौनी एकादशी, गीता जयंती नुकतीच झाली. आज शनिवारी दत्तजयंतीचा शुभदिन. यंदाची दत्तजयंती माउलींच्या शब्दात संदेश देत आहे.

'त्रिदोषी सांडिले शरीर । त्रिकुटी फिटलिया नगर त्रिदाह निमालिया अंतर । जैसे होय ।।'

'त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाणा' असं म्हणतात. तीन संख्येला मोठेच महत्त्व आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश. या त्रिगुणाच्या ज्योतीस्वरूप म्हणजे दत्त दिगंबर. वात, कफ पित्त ही त्रिदोष, सत्त्व, रज, तम हे त्रिगुण या सर्वातच आपलं जीवन सामावलंय जणू!

सत्त्व, रज, तम ही तीन गणरूप शहरंच या जगात पहायला मिळतात. आपले शरीर हे एक नगरच आहे आणि हे शरीर एका महानगरातच राहायला येते आणि या शरीरातून कामस, क्रोध अन् लोभ, वात, कफ, पित्त तसेच चोरी, चहाडी, शिंदळकी

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

इत्यादींतून उद्‌भवलेले आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक असे त्रिताप निमाल्यानंतर आपले शरीर काया, वाचा, मनाने शुद्ध होत एकप्रकारची पुण्यभूमी, पुण्यक्षेत्रच होत असते. हीच ती पावन करणारी श्री दत्तात्रेय जयंती होय.

दत्तजयंतीच्या शुभदिनी सर्व भाविक, विविध मंदिर, मठात भक्तिभावाने पूजाअर्चना करतात. तप आराधना करतात. महाप्रसादांचे नियोजन होते. या भक्तीने भारावलेल्या वातावरणात सर्वांना मंगलमय शुभेच्छा.

दत्ता दिगंबरा या हो । स्वामी आम्हां भेट द्या हो ।।



# महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांचे सर्वेक्षण होणार

### आढावा बैठकीत प्रशासक यशवंत डांगे यांची माहिती



महानगरपालिकेत सर्वेक्षणाचा आढावा घेताना प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे. शेजारील छायाचित्रात बैठकीत उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

नगर – अहिल्यानगर शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांचे महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. याद्वारे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जागा व मालमत्तांची, इमारतींची, घरांची मोजमापे घेऊन मूल्यांकन करण्यात येणार आहे. मार्च अखेरीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे आदेश महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिले आहेत. दरम्यान, गेल्या २० वर्षात शहरात सर्वेक्षण झालेले नाही. महापालिका अधिनियमानुसार दर पाच वर्षांनी सर्वेक्षण होऊन पुनर्मुल्यांकन करणे अपेक्षित आहे. आता हाती घेतलेल्या मालमत्तांच्या सर्वेक्षणामुळे व पुनर्मुल्यांकनामुळे शहरातील सर्व मालमत्तांना कर आकारणी होईल. मार्च महिन्यानंतर नव्या मोजमापांच्या नोंदीनुसार कर आकारणी केली जाणार आहे. यातून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल असा विश्वास प्रशासक डांगे यांनी व्यक्त केला.

प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी गुरुवारी महानगरपालिकेत सर्वेक्षणाचा आढावा घेतला. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व जमीन व इमारती यांचे सर्वेक्षण करुन आवश्यक माहिती संकलीत करणे, मुल्यांकन व आवश्यक तांत्रीक सेवा संगणकीकरण करणे, विविध आज्ञावली विकसीत करुन इतर कामे करणे, यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार महानगरपालिका प्रशासनाकडून मे. सी. ई. इन्फो सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांना कार्यारंभ देण्यात आला आहे. मालमत्तेची डिजीटल छायाचित्रे, जिओ टॅगींग, तसेच मालमत्तेच्या अंतर्गत मोजमापांसाठी, त्यांचे कारपेट व बिल्टअप क्षेत्र डीजीटल उपकरणाद्वारे मोजण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे वसुली लिपिक व मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लिमिटेड यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत हे काम केले जात आहे. त्यासाठी वसुली लिपिक व वसुली मदतनीस आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

मालमत्ताधारकांनी मालमत्ता सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख तपासून त्यांना सहकार्य करावे. त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी. सर्वेक्षणाचे काम हे अहिल्यानगर महानगरपालिका विनामुल्य करत असून यासाठी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्वेक्षणामुळे सर्व मालमत्तांना कर आकारणी होईलच. मात्र, यामुळे मालमत्ताधारकांना आवश्यक असलेल्या मुलभुत सुविधांमध्ये सुधारणा करणे शक्य होणार आहे. या सर्व्हेक्षणाबाबत अथवा सर्वेक्षण कामास येणाऱ्या कर्मचारी, प्रतिनिधींबाबत कुठलीही तक्रार असल्यास amc_anr@rediffmail.com व amc.revision2@gmail.com या ई–मेल आयडी वर तक्रार करावी. याबाबत सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी विनायक गंगाधर जोशी यांच्याशी ९८२२०७६८६५ संपर्क करता येईल, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.



शहरातील उड्डाणपुलावर पलटी झालेला ट्रक छायाचित्रात दिसत आहे.

## उड्डाणपुलावर उसाचा ट्रक पलटी, चालक व क्लीनर सुदैवाने बचावले

नगर – शहरातील उड्डाणपुलावर अपघातांची मालिका सुरूच असून गुरुवारी (दि.१२) रात्री पुन्हा एक अपघात झाला आहे. उड्डाण पुलावरुन भरधाव वेगात दौंडकडे ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक पलटी झाला. गुरुवारी रात्री ९ च्या सुमारास चांदणी चौकाजवळ हा अपघात झाला.

याबाबतची माहिती अशी की नेवासा येथून ऊस घेऊन भरधाव वेगात दौंड कडे जाणाऱ्या मालट्रक (क्र. एम एच ४१जी ६०१६) च्या चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक पुलावर पलटी झाला. या घटनेत ट्रक मधील ऊस पुलावर आणि पुलाखाली रस्त्यावर पडला. या अपघातात ट्रक चालक व क्लिनर जखमी झाले.तर मालट्रकचे मोठे नुकसान झाले.अपघात होताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली.त्यांनी ट्रकचालक व क्लिनर यांना ट्रकमधून काढून उपचाराकरिता रुग्णालयात नेले.

घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिस व भिंगार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. उड्डाण पुलावर रहदारी कमी असल्याने वरून जाणारी वाहने भरधाव वेगात जातात परंतु पुलावर असलेल्या वळणावर वाहनाच्या वेगावरील नियंत्रण सुटल्याने नेहमीच अपघात होतात. ही अपघाताची मालिका लवकरात लवकर थांबवावी त्याकरिता प्रशासनाने ठोस पावले उचलावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# एमआयडीसीत उद्योजकाला टोळक्याकडून बेदम मारहाण

### मारहाणीचे सीसीटिव्ही फुटेज व्हायरल, ६ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

पारनेर – कामगार पळवापळवीवरुन झालेल्या वादातून सुपा येथील औद्योगिक वसाहतीत उद्योजकाला बेदम मारहाण करण्यात आली आहे. मारहाणीचा हा प्रकार सीसीटिव्ही कॅमेरात कैद झाला असून व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात सायंकाळी उशीरा ६ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनेश प्रमोद उरमुडे (वय २४. रा. भोयरे पठार, ता. नगर) असे मारहाणीत जखमी झालेल्या उद्योजकाचे नाव आहे.

याबाबत दिनेश यांचे वडील प्रमोद अंशाबापू उरमुडे (वय ४९. रा. भोयरे पठार, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. उद्योजक दिनेश उरमुडे यांना पाच ते सात जणांच्या टोळक्याने लाथा बुक्क्या, लाकडी दांडक्याने, खुर्चीने बेदम मारहाण केली. या मारहाणीत ते जखमी झाले असून त्यांच्यावर पारनेर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

सुपा औद्योगिक वसाहतीत उरमुडे व मुठे यांचे फॅब्रिकेशनचे वर्कशॉप आहेत. कामगार पळवापळवीवरून दोघांमध्ये वाद झाला. या वादातून दिनेश उरमुडेला मारहाण करण्यात आली. यात उरमुडेचा हात फॅक्चर झाला आहे. दम्यान, वाद मिटवण्यासाठी भोयरे पठार येथील ग्रामस्थ सुपा पोलीस ठाण्यात हजर झाले होते. याबाबत प्रमोद उरमुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सचिन रमेश मुठे, प्रशांत दिलीप आंबेकर, पवन रमेश मुठे, साहिल भाऊसाहेब आंबेकर, ज्ञानदेव दत्तू कार्ले (सर्व रा. भोयरे पठार, ता.नगर), दत्ता पवार (रा.पिंपळगाव कौडा, ता.नगर) यांच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, मजूर, ठेकेदारी व कामगार पळवापळवी यावरून यापुर्वीही सुपा औद्योगिक वसाहतीत संघर्ष झाला आहे. तसेच विविध प्रकारचे ठेके मिळवण्यासाठी अधिकाऱ्यांना उद्योजक, धमकावणे, मारहाणीचे प्रकार झाले आहेत. आता पुन्हा तशाच प्रकाराला सुरुवात झाली असून प्रशासनाने कारवाईचा बडगा उगाराला नाहीतर टोळी युद्ध भडकण्याची शक्यता आहे.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तैलचित्र भेट

मुंबई येथील सागर निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गोयल मेडिकोजचे डायरेक्टर डॉ. बसंत गोयल यांच्या हस्ते गौधना पासून बनविलेले तैलचित्र भेट देण्यात आले. यावेळी कुलदीप सिंह, बी के डॉ. दीपक हरके व अभिनेत्री डॉ. ईशा अगरवाल उपस्थित होते.

## अन्सार सय्यद यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – येथील रहिवासी सय्यद अन्सार बाबासाहेब (वय ४६, रा.आलमगीर, भिंगार) यांचे १२ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर दर्गा दायरा कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या मागे ४ भाऊ, भावजया, पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे. पैलवान सलीम यांचे ते पुतणे होत.

## आश्रु (आप्पा) बनकर यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील रहिवासी आश्रु (आप्पा) शंकर बनकर (वय ६७, रा.मिरजगाव, अ.नगर) यांचे १३ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मिरजगाव येथील शिवाचा मळा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ भाऊ, २ बहिणी, २ मुले, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे.

## कमलाकर सुरडकर यांचे हृदयविकाराने निधन

नगर – डावखररोड येथील सागर प्रिंटिंग प्रेसचे मालक कमलाकर अनंत सुरडकर (वय ६८) यांचे १३ डिसेंबर रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर १३ डिसेंबर रात्री ९:३० वा. श्रीरामपूर येथे करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कमलाकर हे कृष्णा सुरडकर यांचे धाकटे बंधू, ऋषिकेश सुरडकर यांचे वडील, निशिकांत, वैभव, सचिन, निसर्ग, स्वप्निल योगेश, संदेश, अभिजीत व सागर सुरडकर यांचे चुलते होत.

# एमआयडीसीतील रस्ते, पाणी, लाईटसह विविध समस्यांबाबत कार्यवाही करणार

### मुख्य अभियंत्यांचे आश्वासन

नगर – नागापूर एमआयडीसीतील रस्ते, पाणी, ड्रेनेज लाईन, कचरा, टपऱ्यांची अतिक्रमणे, लाईट या समस्या तातडीने सोडविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन एमआयडीसीचे मुख्य अभियंता (मुंबई) नितीन वानखेडे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत देण्यात आले.



एमआयडीसीतील विविध समस्यांसंदर्भात मुख्य अभियंता नितीन वानखेडे यांना निवेदन देताना उद्योजक पहिल्या छायाचित्रात तर समस्यांसदर्भात आयोजित बैठकीत चर्चा करताना अधिकारी व उद्योजक.

एमआयडीसीतील विविध समस्यांसंदर्भात उद्योजकांच्या शिष्टमंडळाने मुख्य अभियंता (मुंबई) नितीन वानखेडे यांना निवेदन देऊन चर्चा केली. श्री. वानखेडे यांच्या उपस्थितीत यावेळी बैठक झाली. बैठकीस एस ई राहुल तिडके, श्री. कोथवड (ईई पुणे), आर पी. थोटे, अहिल्यानगर एमआयडीसीचे उपअभियंता श्री. बडगे आदींसह उद्योजक उपस्थित होते. एमआयडीसीतील सन फार्मा ते निंबळक रस्ता अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. ते काम सीईओ यांना भेटून मार्गी लावण्यात येईल. त्यामध्ये असणारे खड्डे ८ ते १० दिवसांमध्ये बुजविले जाणार आहेत

एमआयडीसीतील अंतर्गत रस्ते व साईड पट्ट्यांची कामे एक महिन्यामध्ये पूर्ण केली जातील. पंपिंग स्टेशन ते एमआयडीसी नवीन पाईप लाईन टाकणे काम लवकरच करण्यात येईल. एल ब्लॉक मधील गटारीमुळे कंपन्यांमध्ये पाणी जात आहे. त्याचे नियोजित काम एक महिन्यात पूर्ण केले जाईल. भूमिगत गटारी एक महिन्यात स्वच्छ करण्यात येतील. एमआयडीसीतील अंतर्गत रस्त्यालगत असणारी झाडेझुडपे एक महिन्यात काढण्यात येतील. एम ब्लॉक मध्ये रस्त्यावरील कचऱ्यामुळे त्या भागात अतिशय दुर्गंधी पसरत आहे, त्यासाठी दर १५ दिवसांनी जेसीबीच्या साहाय्याने कचरा उचलण्यात येईल. एमआयडीसी मध्ये टपऱ्यांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे तरी ते लवकरच काढण्यात येईल स्ट्रीट लाईटचा लुमिनियस (wattes) कमी असल्यामुळे पुरेसा प्रकाश पडत नाही, त्यासाठी लवकरच नवीन एलईडी बल्ब बसिवण्यात येतील

या बैठकीस जयद्रथ खाकाळ, महेश इंदाणी, प्रफुल पारख, निनाद टिपुगडे, अमोल घोलप, सागर निंबाळकर, राजेंद्र कटारिया, सचिन पाठक, सतीश गवळी, प्रसन्न कुलकर्णी, गणेश बेरड, सुमित लोढा, प्रमोद मोहोळे, सचिन काकड उपस्थित होते.

# 'फाऊंडेशन बिल्डर अॅवॉर्ड'ने नगरमधील शिक्षकांचा चित्रकूट गुरूकुलतर्फे सन्मान



चित्रकूट गुरूकुलच्यावतीने नगरमधील शिक्षकांना फाऊंडेशन बिल्डर अॅवॉर्डने सन्मानित करण्यात आले.


नगर – चित्रकूट गुरूकुलच्यावतीने नवीन पिढी घडविण्यासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांचा फाऊंडेशन बिल्डर अवार्डने सन्मान करण्यात आला. नगरमधील ५० अधिक शाळांमधील २०० पेक्षा अधिक शिक्षकांचा सन्मान सोहळा नुकताच पार पडला. याप्रसंगी प्रा.तोसेंद्र द्विवेदी, कोमल गोएंका यांच्यासह चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे संचालक संजय चव्हाण, सीईओ अशोक सचदेव, चित्रकूट गुरूकुलच्या प्राचार्या सारिका आनंद आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणेश वंदनेने झाली. प्रास्ताविक करताना सारिका आनंद यांनी सांगितले की, समाजाचा सर्वांगीण विकास साधून राष्ट्र निर्माणात योगदान देणारी पिढी घडविण्याचे काम शिक्षक, शिक्षण संस्थाचालक करत असतात. शिक्षक फक्त पुस्तकी ज्ञान देत नाही तर मुलांमध्ये नीतीमूल्य, संस्कार रूजवून त्यांना भविष्यातील स्पर्धेच्या युगासाठी अधिक सक्षम बनवतात. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या अशा शिक्षकांचा चित्रकुट गुरूकुलच्यावतीने द फाऊंडेशन बिल्डर अवार्डने सन्मान करतांना मनापासून आनंद होत आहे. यावेळी शिक्षण, व्यवसाय, तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी भविष्यातील शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, नवनवीन तंत्रज्ञान व शिक्षण पद्धती यावर विचार मांडले.

या कार्यक्रमासाठी सन १९४६ पासून सर्वोत्तम व विश्वसनीय सुवर्ण सेवा देणारे सहदेव ज्वेलर्स, ओमोटेक ही संस्था जी संशोधन आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमात अग्रेसर आहे आणि रेक्स शूज ही भारतातील अग्रगण्य फुट वेअर निर्माता कंपनीचे सहकार्य लाभले.

## नगरमध्ये १५ डिसेंबरपर्यंत ज्योतिष अभ्यासकाच्या मार्गदर्शनाची संधी

नगर – नगरमध्ये हॉटेल आयरिस येथे गहना डायमंड व गोल्ड ज्वेलरीचे एक्झिबिशनला सुरूवात झाली आहे. १५ डिसेंबर पर्यंत सकाळी १०.३० ते रात्री ८ यावेळेत सदर विक्री प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. पुणे पिंपरी चिंचवड येथील मोहिनी ज्वेलर्स ब्रॅण्डचे खास कलेक्शन याठिकाणी असणार आहे. याबरोबरच ज्योतिष अभ्यासक मन खेरगांवकर यांच्या अभ्यासपूर्ण ज्योतिष मार्गदर्शनाचा लाभही नगरकरांना मिळणार आहे. वास्तूशास्त्रापासून वैयक्तिक आरोग्याविषयीही ते मार्गदर्शन करतील. ज्योतिष शास्त्रानुसार जीवनातील अनेक समस्यांची सोडवणूक होऊ शकते. प्रत्येकाचे आयुष्य, भाग्य वेगवेगळे असते. ज्योतिष शास्त्र प्रत्येकाला चांगले जीवन जगण्यासाठी उपयोगी ठरू शकते. मन खेरगांवकर यांनी अतिशय तरूण वयात ज्योतिष शास्त्राचा सखोल अभ्यास केला आहे.



मन खेरगांवकर

वेदीक ज्योतिष, वास्तू शास्त्र, विवाह योग, व्यवसाय वृद्धी, चांगले करियर, आरोग्य समस्या, मुलांचे जन्म, कोर्ट मॅटर अशा अनेक समस्यांची ज्योतिष शास्त्रानुसार उत्तरे खेरगांवकर देतात. यासाठी संपर्क : ९१३७९८५३७९.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### लाल केळी खा हेल्दी रहा

लाल केळ्यांमध्ये अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे मोठ्या प्रमाणात असतात. हे अँटिऑक्सिडंट्स शरीराला मुक्त रॅडिकल्सपासून वाचवतात आणि अनेक आजारांपासून बचाव करण्यास मदत करतात. याने रक्तदाब व हृदयरोगावर नियंत्रण मिळविता येते.

## पाककला

### डिनर स्पेशल मटार पुलाव

**साहित्य :** १.५ कप बासमती तांदूळ, १ कप मटार, २ वेलची, ३ लवंगा, १ तमालपत्र, १ चमचा जिरे, २ चमचे आले लसूण पेस्ट, २ हिरवी मरची मधून कापलेली, २ चमचे बारीक चिरलेला पुदिना, २ चमचे कोथिंबीर, १ चमचा गरम मसाला, १ काप बारीक चिरलेला कांदा, १ चमचा मेथीची पाने, २ चमचे तुप, चवीपुरते मीठ

**कृती :** सर्वात आधी तांदूळ स्वच्छ धुवून भिजत घालावा. नंतर त्यामधील पाणी काढून घ्यावे. आता एक कुकर घेऊन त्यामध्ये तूप घालून जिरे घालावे. मग यामध्ये सर्व मसाले तमालपत्र, लवंग आणि वेलची घालावी. सुगंध येईपर्यंत परतवून घ्यावे. मग यामध्ये कांदा आणि मिरची घालावी. आता हे परतवल्यानंतर त्यामध्ये आले लसूण पेस्ट, पुदिना आणि कोथिंबीर घालावी. तसेच आता यामध्ये मटार घालून परतवून घ्यावे. यानंतर तांदूळ, गरम मसाला, मेथीची पाने घालून परतवून घ्यावे. मग यामध्ये पाणी आणि मीठ घालावे. कुकरचे झाकण लावल्यानंतर एक शिट्टी द्यावी व गॅस मध्यम करावा व पाच मिनिट नंतर गॅस बंद करावा. कुकर थंड झाल्यानंतर त्याचे झाकण उघडावे आणि त्यामध्ये वरून कोथिंबीर घालावी.

## वास्तू

### डस्टबीन संबंधी

वास्तुशास्त्राप्रमाणे घरात कचराकुंडी ठेवण्यासाठी दक्षिण-पश्चिम (South-West) दिशा सर्वात उपयुक्त मानली गेली आहे. या दिशेत डस्टबिन ठेवल्याने नकारात्मक ऊर्जेचा प्रभाव नाहीसा होतो आणि घरात सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. तथापि, डस्टबिन नियमितपणे स्वच्छ करा आणि घरात जास्त वेळ कचरा ठेवू नका हेही लक्षात ठेवा. हे नकारात्मक ऊर्जा प्रतिबंध करण्यास मदत करते.

## सल्ला

दररोज कोरफड जेलने ब्रश करून तुम्ही श्वासाची दुर्गंधी दूर करू शकता. त्यामुळे तोंडाला ताजेपणाही मिळतो.

## सौंदर्य

कॉफी आइस क्यूब्सचे थंड तापमान त्वचेला ताजेतवाने अनुभव देते. शीतलता त्वचेची जळजळ कमी करते आणि डोळ्यांखालील त्वचेला ऊर्जा देते, चेहरा अधिक ताजे आणि उत्साही बनवते.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**शनिवार, दि. १४ डिसेंबर २०२४**

**श्री दत्तात्रेय जयंती, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, रोहिणी २७|५५, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल.

**वृषभ :** मित्रांचा आधार घेऊन कार्य कराल. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन :** आरोग्य उत्तम राहील. काही काळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल.

**कर्क :** मान-सन्मानात वाढ होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**सिंह :** न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**कन्या :** आपल्या आवडीनिवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे. मान सन्मानात वाढ होईल.

**तूळ :** आपल्या मनात असलेल्या योजना पूर्ण होतील.

**वृश्चिक :** आपल्या क्रोधावर संयम ठेवल्याने दिवस आनंदात जाईल.

**धनु :** अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल.

**मकर :** अडचणी येण्याची शक्यता आहे. शत्रू वर्गापासून दूर राहा.

**कुंभ :** आर्थिक नुकसानीची शक्यता आहे.

**मीन :** धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


गणिताचे शिक्षक स्टाफरूममधे रिकाम्या डब्यात चपाती बुडवून खात होते...
मराठीचे शिक्षक म्हणाले सर डब्यात तर काहीच नाही...
**गणिताचे शिक्षक :** आम्ही भाजीला 'एक्स' मानल आहे..!

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

- ✻ कूक बेटांचा समूह किती बेटांचा मिळून बनलेला आहे? - १५ बेट
- ✻ कूक बेटामध्ये सर्वात लोकप्रिय असा कोणता खेळ खेळला जातो? - रग्बी
- ✻ लिहाड समुद्री खडक कधी शोधून काढला? - २३ फेब्रुवारी १८२३
- ✻ अरामोअर रीफ कॉमनवेल्थ समुद्री साठा समूह कधी स्थापित झाला होता? - ऑगस्ट १९८३

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०७० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) बंगालच्या उपसागारतील एक बेट ४) अतिशयपणा; अफलातून काम ७) रुबाब; ऐट; तोरा ८) सारख्या स्वभावाचा १०) चिरणारे; फाडणारे ११) आठवड्यातील सुट्टीचा दिवस १४) ध्वनी; आवाज; छंद १६) हस्त; हात; महसूल; सारा १८) दहा १९) मोबदला घेऊन घरकाम करणारी स्त्री २१) घर; निवासस्थान; गृह २२) एक चर्मवाद्य २३) मध्ये दांडा घालून त्याच्याशी हातपाय जखडून टाकण्याची शिक्षा; अडथळा

**उभे शब्द :-** १) रात्री फिरणारे राक्षस, चोर वगैरे २) कोपरा ३) रसमय; रसाळ ४) सुवर्ण; सोने; कांचन ५) एक क्षुद्र कीटक; मक्षिका ६) स्त्री; विलासिनी स्त्री ९) चोप; ताडन १०) चर्चा; वाद १२) संपूर्ण नाश; विध्वंस १३) एक प्राणी; अजा; शेळी १५) वर्तुळाकृती १७) लष्कराचे एक वाहन १८) पत्थर; पाषाण; धोंडा १९) आकर्षण; हवेहवेसे वाटणे २०) भयंकर २१) एक प्रकारची तांबडी माती; गेरू

### शब्दगंध क्र. ७०६९ चे उत्तर



### फिल्मीचक्कर क्र. ११६७ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
अ‍ॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** भाकरी आपल्याला जगवते आणि गुलाबाचं फूल कशासाठी जगायचं हे शिकवते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### काही लोकांना जास्त थंडी का वाजते?

घर असो किंवा ऑफिस, तुमच्या आजूबाजूला अशी एखादी व्यक्ती नक्कीच असेल ज्याला खूप थंडी जाणवते. तुम्हाला माहीत आहे का काही लोकांना इतरांपेक्षा जास्त थंडी का वाटते? शरीरातील काही आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजांची कमतरता हे त्यामागचे कारण आहे. हे कोणत्या पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे होते? ते जाणून घेऊया. लोह आपल्या लाल रक्तपेशींमध्ये म्हणजेच आरबीसीमध्ये हिमोग्लोबिन तयार करण्यास मदत करते. मग हे हिमोग्लोबिन फुफ्फुसातून शरीराच्या इतर भागात ऑक्सिजन घेऊन जाते. आता जर लोहाची कमतरता असेल तर हिमोग्लोबिन योग्य प्रकारे तयार होत नाही. यामुळे शरीरात रक्ताची कमतरता निर्माण होते. ज्याला अशक्तपणा म्हणतात आणि अशक्तपणाचे एक सामान्य लक्षण म्हणजे खूप थंडी जाणवणे. अनेक वेळा आपण पुरेसे लोह खात असतो. पण तरीही थंडी जाणवते. व्हिटॅमिन सीची कमतरता हे त्यामागचे कारण आहे. शरीरात लोह योग्यरित्या शोषून घेण्यासाठी व्हिटॅमिन सी आवश्यक आहे. शरीरात पुरेसे व्हिटॅमिन सी नसल्यास भरपूर लोह खाल्ले तरी शरीराला त्याचा फायदा होणार नाही. कारण तुमचे शरीर लोहाचे योग्य शोषण करू शकत नाही. परिणामस्वरुप हिमोग्लोबिनची पातळी कमी होते. मग रक्ताची कमतरता असेल आणि तुम्हाला खूप थंडी जाणवेल. अशा परिस्थितीत जर तुम्हाला सर्दी टाळायची असेल तर लोहासोबत व्हिटॅमिन सीचे सेवन करणे गरजेचे आहे.

कधीकधी व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे एखाद्याला थंडी जाणवू लागते. वास्तविक ते लाल रक्तपेशींच्या निर्मितीमध्ये देखील मदत करते. त्याच्या कमतरतेमुळे व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे निमिया होऊ शकतो. आता फोलेट व्हिटॅमिन बी १२ लाल रक्तपेशी तयार करण्यात मदत करते. हे दोघे एकत्र काम करतात. अशा परिस्थितीत शरीरात फोलेटची कमतरता असल्यास. तरीही तुम्हाला खूप थंडी जाणवेल. व्हिटॅमिन बी१२ साठी तुम्ही अंड्यातील पिवळ बलक, पालक, केळी, सोया मिल्क आणि चीज घेऊ शकता. जर तुम्हाला लैक्टोज असहिष्णु नसेल तर तुम्ही दूध पिऊ शकता. काजू आणि बिया खाऊ शकतात.

तथापि यापैकी कोणत्या पोषक तत्वांची कमतरता आहे? हे शोधण्यासाठी, एक साधी रक्त तपासणी केली जाऊ शकते. तसेच ज्यांना हायपोथायरॉईडीझम आहे. म्हणजेच ज्यांच्या शरीरात थायरॉईड संप्रेरक कमी होत आहे. त्यांनाही जास्त थंडी जाणवते. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने ते थायरॉईडशी संबंधित चाचण्या करून घेऊ शकतात.

### चंद्रावरील ससा


अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका घनदाट जंगलामध्ये एका नदीच्या किनारी ससा, कोल्हा, माकड आणि पाणमांजर राहायचे. या सर्व मित्रांची एकच इच्छा होती की सर्वात मोठा दानशूर बनण्याची. एके दिवशी चौघांनी मिळून ठरवले की आपण काहीतरी दान करू या. चारही मित्रांनी आपापले घर सोडले.

पाणमांजर नदीच्या किनाऱ्यावरून सात मासे घेऊन आला. कोल्हा दही भरलेली हंडी आणि मांसाचे तुकडे घेऊन आला. त्यानंतर माकड झाडावरून आंबे घेऊन आले. दिवस संपायला आला होता पण सश्याला काय आणावे हे समजत न्हवते. ससा रिकाम्या हाताने आला. रिकाम्या हाताने परतलेला ससा पाहून तिघा मित्रांनी त्याला विचारले 'तू काय दान करशील? आज दान केल्याने महान दानाचा लाभ मिळेल माहित नाही का?' यावर ससा म्हणाला, 'हो मला माहीत आहे म्हणून आज मी स्वतः दान करण्याचा निर्णय घेतला आहे.' हे ऐकून सशाच्या सर्व मित्रांना आश्चर्य वाटले. ही बातमी भगवान इंद्राला मिळताच ते थेट पृथ्वीवर आले.

पृथ्वीवर ऋषीच्या वेषात आलेले इंद्र चार मित्रांजवळ गेले व प्रथम कोल्हा, माकड आणि पाणमांजर यांनी दान केले. त्यानंतर भगवान इंद्र सशाजवळ आले व म्हणाले, 'तू काय दान देणार?' सशाने सांगितले की तो स्वतःचे दान करत आहे. हे ऐकून इंद्रदेवांनी आपल्या सामर्थ्याने तिथे आग लावली आणि सशाला आत बसण्यास सांगितले. ससा आगीमध्ये बसला. हे पाहून इंद्राला आश्चर्य वाटले. त्याला असे वाटले की ससा खरोखर एक महान दाता आहे आणि हे पाहून भगवान इंद्र खूप आनंदित झाले. दुसरीकडे आगीतही ससा सुरक्षित उभा होता. तेव्हा इंद्रदेव म्हणाले की, ''मी तुझी परीक्षा घेत होतो. ही आग खोटी आहे, त्यामुळे ती तुम्हाला इजा करणार नाही'' असे सांगितल्यावर इंद्रदेव सशाला आशीर्वाद देत म्हणाले की, ''तुझे हे दान सर्व जग सदैव लक्षात ठेवेल. मी चंद्रावर तुझ्या शरीराची खूण करीन'' व भगवान इंद्राने एका पर्वताचा चुरा करून चंद्रावर सशाची खूण केली. तेव्हापासून असे मानले जाते की चंद्रावर सशाचे ठसे आहे आणि अशा प्रकारे चंद्रावर न पोहोचताही सशाचे ठसे चंद्रावर पोहोचले.

**तात्पर्य -** कोणतेही काम करण्यासाठी प्रबळ आत्मविश्वास असणे आवश्यक आहे.

## रहमते दर्शन (भाग - १)



### प्रस्तावना

उनके दुःखों के भार को अपने ऊपर लेकर, उनके दर्द को आराम पहुँच कर, उनकी प्रार्थनाओं को पूरी करके महाराज जी उन्हें एक असीम खुशी और सरमस्ती से भर देते थे। फिर वो उस प्यार को उन सबमें फैलाते थे, जो उन्हें मिलता था। महाराज जी उन्हें प्यार से इतना भरपूर कर देते थे कि वो प्यार उनसे छलकता था। जब कोई प्यार से लबालब भर कर छलक रहा होता है, तो वो उस प्यार को औरों के साथ बाँटता है।

महाराज जी इस बात का ख़ास ख्याल रखते थे कि प्रत्येक को उसकी ज़रूरत से ज्यादा ही मिले। अगर कोई उनसे थोड़ी सी दया मेहर के लिए प्रार्थना करता, तो वो उस पर इतनी दया- मेहर करते कि उसका प्याला लबालब भर कर छलकने लगता था और इस प्रकार उसका प्याला बड़ा करके भेजते थे। जब उसका बड़ा प्याला लबालब भर जाता, तो वो दूसरों के साथ बाँटने के लिए काफी होता। अगर कोई दो लोग किसी बात पर असहमत होकर उनके पास आते, तो वो उन दोनों को ही इतना प्यार से भर देते थे कि वो दोनों भूल जाते थे कि वो किस बात पर असहमत हैं। अगर दो बच्चे भूखे हैं, तो उनका झगड़ा करना स्वाभाविक ही है। लेकिन अगर आप दोनों को खिलाओ और संतुष्ट कर दो, तो वो आगे झगड़ा नहीं करेंगे। दूसरे के हिस्से से सिर्फ वो ही ईर्ष्या करता है, जिसे खुद को नहीं मिलता, जो भूखा रहता है। लेकिन अगर सबकों उनके दिल की संतुष्टि के मुताबिक़ दे दिया जाये, तो फिर ऐसा कुछ नहीं रह जाता जिसमें किसी से कुछ लिया जाये या किसी को कुछ दिया जाये।

तो महाराज जी सबको प्यार से भरकर उनकी समस्याओं को दूर कर देते थे। वो सब महसूस करते थे कि महाराज जी ने उन्हें सुना, उनकी बातों पर ध्यान दिया, उन्हें समझा। फिर वो सबकी समस्या का हल ऐसा निकालते थे जिससे सब खुश हो जाते थे।

अपनी अंतर्दृष्टि और समझदारी से वो हर एक को विजयी बना देते थे। यह जीतने का संकल्प पहले से ही उनकी ज़िन्दगी का हिस्सा बन चुका था। महाराज जी जानते थे कि भजन - अभ्यास में ध्यान टिकाने के लिए पहले मन में आने वाली सभी उलझनों को दूर करना ज़रूरी है। अगर इंसान दूसरों के साथ झगड़े को लेकर परेशान है, घबराया हुआ है, तो वो भजन - अभ्यास में ध्यान नहीं टिका सकता।

इसलिये महाराज जी इस बात का खास ख्याल करते थे कि सबकी समस्याओं को इस तरह दूर किया जाये, जिससे वे महसूस करें कि कोई उनको प्यार करता है, उनका सम्मान करता है, उनको समझाता है। उनका ये अद्भुत तरीका था, जिससे प्रत्येक व्यक्ति ये महसूस

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

उम्मीदें करना आप के हाथ में है पर पूरा करना नहीं। रिश्तो में इस बात को हावी न होने दें कि मैं क्यो काम करूँ, तुम करो। प्रेम पाने व देने के लिए प्यार भरे शब्दो का प्रयोग करें। कठोर शब्दो में न बोलें और न ही कटाक्ष करें। तेज आवाज और कटु शब्दों से दूसरे का दिल दुखता है। अपनी बात को शांति और प्रेम से प्रकट करें ताकि सामने वाले को गुस्सा न आये । हर रोज भगवान के बिंदू रूप या ईष्ट को सामने देखते रहें और मन में कहते रहें आप प्यार के सागर हैं। ऐसा करने से आप को भगवान से सदा शक्ति मिलती रहेगी और आप जहां भी रहेंगे आप के सभी के साथ मधुर संबन्ध रहेंगे। आप का समय सफल होगा।

समय प्रबन्धन और नये आईडियाज

व्यक्ति के मन में अनकों विचार चलते रहते हैं। व्यर्थ विचारों से समय नष्ट होता है। जीवन में बदलाव तभी आता है जब आप का मन किसी नये विचार से टकराता है। आप के दिमाग में जितने नये विचार होंगे आप के पास उतने नये हल होंगे। जितने नये विचार होंगे आप सही समय और स्थान पर अपने जीवन को बदल सकेंगे। हर इन्सान को एक वर्ष में चार ऐसे विचार अवश्य आते हैं जो लागू किए जाएं तो उस से महान बन सकते हैं। कई बार कोई नई चीज बाजार में या अध्यात्म में आते ही चल निकलती है और आप को याद आता है कि आपने भी बहुत पहले उसे करने के बारे में सोचा था पर लागू नहीं कर सके थे। आप ने उस आडिया पर काम नहीं किया। वह आडिया किसी और के पास चला गया। जिसने उसे लागू करने का जोखिम उठाया। आप चाहते तो वैसा ही कर सकते थे। आप के आसपास आडियाज की भरमार है। आप को एक आडिया चाहिए जिसे अपना कर अपनी किस्मत बदल सकते हैं। हर बालक जन्मजात जीनियस होता है। आप भी जीनियस हैं। आप में किसी भी परेशानी को हल करने, किसी बाधा से पार जाने की योग्यता व क्षमता है। सिर्फ उन लोगों से बच कर रहो जो आप के विचारों को काटते हैं, आप के प्रति नकारात्मक कॉमेंट देते हैं, तुम्हे डांटते हैं, बात बात पर झिडक देते हैं। आप लेजर बीम भी है।

सिर्फ किसी आडिया को कार्य में लगाओ। मन की शक्तियों को जगाने का एक ही उपाय है। राह में आने वाली बाधाओं के प्रति सजग रहना। स्पष्ट रहना ज्यादा रचनात्मक आडिया उनके पास आते हैं जो हर विषय की गहरी जानकरी रखते हैं। जब आप कुछ ऐसा सोचते हैं जो किसी दूसरे ने न सोचा हो तो उसे आडिया कहते हैं। मन में एक केन्द्र है, एक मांसपेशी है जो नये आडिया निकालती है। इस मांसपेशी का जितना उपयोग करेगें, अधिक विकसित होती है और अधिक अच्छे आडिया देगी। यही रचनात्मक सोच भी कहलाती है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

✻ सी.डी. ऐकणे (दुपारी ४.३० ते ५.३० वा.) :

घरातील इतर कामे करावीत व कामे करीत असताना गर्भसंस्कार सी.डी. ऐकावी.
✻ परमेश्वरचिंतन : संध्याकाळी देवाजवळ दिवा लावून प्रार्थना करावी. शुभंकरोती, रामरक्षा स्तोत्र म्हणावे. तसेच गणपती स्तोत्र, अथर्वशीर्ष, सरस्वती स्तोत्र यांचे आलटून पालटून वाचन करावे. सर्वांत शेवटी शांतीमंत्र म्हणावा. देवाजवळ आपल्या व बाळाच्या रक्षणासाठी प्रार्थना करावी. प्रार्थना झाल्यानंतर घरातील सदस्यांबरोबर मैत्रिणींबरोबर संवाद साधवा व त्यानंतर संध्याकाळचा स्वयंपाक घरातील इतर कामे करावीत. मोठे मूल असल्यास त्याचा अभ्यास घ्यावा. घरातील वातावरण प्रसन्न असावे.

✻ सूप पिणे (६.०० वा.) :

दुधी भोपळ्याचे सूप, मक्याच्या दाण्यांचे सूप, मुगाचे सूप गरम-गरम प्यावे. यामध्ये सकस, पोषक, आरोग्यदायी घटक भरपूर प्रमाणात असतात.

✻ रात्रीचे जेवण (८.०० ते ८.३० वा.) :

रात्रीचे जेवण लवकर करावे. घरातील सर्व सदस्यांनी मिळून, पतीसोबत आणि मोठे अपत्य असेल, तर अपत्यासोबत रात्रीचे जेवण करावे. जेवण हलक्या स्वरूपाचे असावे. पालेभाज्यांची पोळी, थालीपीठ त्यासोबत नारळाची, पुदिन्याची चटणी खावी. मुगाच्या डाळीची खिचडी, सर्व भाज्या टाकून केलेला पुलाव त्यावर साजूक तूप टाकून खावा. दोनही जेवणामध्ये साजूक तुपाचा वापर १ चमचा करावा. तूप हे अग्निप्रदीप्त करणारे व बाळाची बुद्धी तेजस्वी करणारे असते. **१०. कला जोपासणे (१२.०० ते १.००) :** जेवण घेतल्यानंतर लगेचच आराम करू नये, कारण खाल्लेले अन्न ढेकर येणे, मळमळ, उलटी होणे असा त्रास होऊ शकतो; म्हणून थोडी बरोबर एखादा आवडता छंद जोपासावा. विणकाम, भरतकाम, चित्र काढण, एखादे पुस्तक वाचणे असे छंद जोपासावेत. कुठलेही काम करताना तान सीडी सौम्य आवाजात चालू ठेवावी; यामुळे मन प्रसन्न राहते व मनाने करू नये, कारण खालेले अन्न घशाशी येऊन अपचन सहाऊ शकते; म्हणून थोडी शतपावली करावी.

✻ कुठलेही काम करताना तानपुरा, बासरीवादन यांची राहतात. मन मन प्रसन्न राहते व मनामध्ये सकारात्मक विचार येतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# १४ डिसेंबर : दत्त जयंती



एक सांप्रदायिक जन्मोत्सव. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असतो.

**१. दत्त जयंतीचे महत्त्व –** दत्त जयंती या दिवशी दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी दत्ताची मनोभावे नामजपादी उपासना केल्यास दत्ततत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यास साहाय्य होते.

**२. जन्मोत्सव साजरा करणे –** दत्त जयंती साजरी करण्यासंबंधाने शास्त्रोक्त असा विशिष्ट विधी आढळून येत नाही. या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. यालाच गुरुचरित्रसप्ताह असे म्हणतात. भजन, पूजन आणि विशेषकरून कीर्तन वगैरे भक्तीचे प्रकार प्रचारात आहेत. महाराष्ट्रात औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवाला विशेष महत्त्व असते. तामिळनाडूमध्येही दत्त जयंतीची प्रथा आहे. दत्त जयंती या दिवशी काही ठिकाणी दत्तयाग केला जातो.

### दत्तयाग

दत्तयाग यामध्ये पवमान पंचसूक्ताच्या आवृत्त्या (जप) आणि त्याच्या दशांशाने किंवा तृतीयांशाने घृत (तूप) आणि तीळ यांनी हवन करतात. दत्तयागासाठी केल्या जाणार्या जपाची संख्या निश्चित नाही. स्थानिक पुरोहितांच्या समादेशानुसार जप आणि हवन केले जाते.

**पुराणांनुसार जन्माचा इतिहास –** अत्रीऋषींची पत्नी अनसूया ही पतीव्रता होती. पातिव्रत्यामुळे तिच्या अंगी एवढे सामर्थ्य आले की, इंद्रादी देव घाबरले आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांकडे जाऊन म्हणाले, ''तिच्या वराने कोणालाही देवांचे स्थान मिळू शकेल किंवा कोणीही देवांना मारू शकेल; म्हणून तुम्ही काहीतरी उपाय करा, नाहीतर आम्ही तिची सेवा करू.'' हे ऐकून त्रिमूर्ती म्हणाले, ''एवढी काय मोठी पतीव्रता, सती आहे, ते आपण पाहू.''

एकदा अत्रीऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेल्यावर अतिथींच्या वेशात त्रिमूर्ती आले आणि अनसूयेकडे त्यांनी भिक्षा मागितली. त्यावर अनसूयेने सांगितले, ''ऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेले आहेत. ते येईपर्यंत थांबा.'' तेव्हा त्रिमूर्ती अनसूयेला म्हणाले, ''ऋषींना परत यायला वेळ लागेल. आम्हाला खूप भूक लागली आहे. लगेच अन्न द्या, नाहीतर आम्ही दुसरीकडे जाऊ. ऋआश्रमात आलेल्या अतिथींना तुम्ही इच्छाभोजन देता', असे आम्ही ऐकले आहे; म्हणून इच्छाभोजन करण्यास आम्ही आलो आहोत.'' मग अनसूयेने त्यांचे स्वागत केले आणि जेवायला बसण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ते जेवायला बसले. ती जेवण वाढायला आल्यावर ते म्हणाले, ''तुझे सुंदर रूप पाहून आमच्या मनात अशी इच्छा झाली आहे की, तू विवस्त्र होऊन आम्हाला वाढावेस.'' त्यावर 'अतिथीला विन्मुख पाठवणे अयोग्य होईल. माझे मन निर्मळ आहे, मग कामदेवाची काय बिशाद आहे ? माझ्या पतीचे तपफळ मला तारील', असा विचार करून ती अतिथींना म्हणाली, ''मी तुम्हाला विवस्त्र होऊन वाढीन. तुम्ही आनंदाने भोजन करा.'' मग स्वयंपाकघरात जाऊन पतीचे चिंतन करून तिने विचार केला की, 'अतिथी माझी मुले आहेत' आणि विवस्त्र होऊन वाढायला आली. पहाते तो अतिथींच्या जागी रडणारी तीन लहानबाळे ! त्यांना कडेवर घेऊन तिने स्तनपान करवले आणि बाळांचे रडणे थांबले. इतक्यात अत्रीऋषी आले. तिने त्यांना सर्व वृत्तान्त सांगितला. ती म्हणाली, ''स्वामिन् देवेन दत्तं ।'' याचा अर्थ असा आहे – 'हे स्वामी, देवाने दिलेली (मुले).' यावरून अत्रींनी त्या मुलांचे नामकरण 'दत्त' असे केले. बाळे पाळण्यात राहिली आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश त्यांच्यासमोर उभे राहिले आणि प्रसन्न होऊन 'वर मागा', असे म्हणाले. अत्री आणि अनसूयेने 'बालके आमच्या घरी रहावी', असा वर मागितला. पुढे ब्रह्मदेवापासून चंद्र, विष्णूपासून दत्त आणि शंकरापासून दुर्वास झाले. तिघांपैकी चंद्र आणि दुर्वास तप करण्यास जाण्यासाठी अनुमती घेऊन अनुक्रमे चंद्रलोकी आणि तीर्थक्षेत्री गेले. तिसरा दत्त विष्णुकार्यासाठी भूतलावर राहिला.

### दत्त अवतार

**दत्ताच्या परिवाराचा भावार्थ –** दत्ताच्या पाठीमागे असलेली गाय म्हणजे पृथ्वी आणि चार श्वान म्हणजे चार वेद. औदुंबराचा वृक्ष हे दत्ताचे पूजनीय रूप आहे; कारण त्यात दत्ततत्त्व जास्त प्रमाणात असते.

दत्तगुरुंनी पृथ्वीला गुरु केले आणि पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि सहिष्णु असावे अशी शिकवण घेतली. तसेच अग्नीला गुरु करून, हा देह क्षणभंगूर आहे, अशी शिकवण अग्नीच्या ज्वालेपासून घेतली. अशाप्रकारे चराचरांतील प्रत्येक वस्तूमध्ये ईश्वराचे अस्तित्व पहाण्यासाठी म्हणून दत्तगुरुंनी चोवीस गुरु केले.

'श्रीपाद श्रीवल्लभ' हा दत्ताचा पहिला अवतार आणि 'श्री नृसिंह सरस्वती' हा दुसरा अवतार होय. तसेच 'माणिकप्रभु' तिसरे आणि 'श्री स्वामी समर्थ महाराज' हे चौथे अवतार होत. हे चार पूर्ण अवतार असून अंशात्मक अवतार अनेक आहेत. जैनपंथीय दत्तगुरुंकडे 'नेमिनाथ' म्हणून पहातात आणि मुसलमान 'फकिराच्या वेशात' पहातात.

दत्त दररोज खूप भ्रमण करीत. ते स्नानासाठी वाराणसीला, चंदनाची उटी लावायला प्रयागला जात, तर दुपारची भिक्षा कोल्हापूरला मागत आणि दुपारचे जेवण पांचाळेश्वर, बीड जिल्हा येथे गोदावरीच्या पात्रात घेत असत. तांबुलभक्षणासाठी मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात राक्षसभुवन येथे जात, तर प्रवचन आणि कीर्तन ऐकण्यासाठी नैमिष्यारण्यात बिहार येथे पोहोचत. निद्रेसाठी मात्र माहूरगडावर जात आणि योग गिरनार येथे करीत.

दत्तपूजेसाठी सगुण मूर्तीऐवजी पादुका आणि औदुंबरवृक्ष यांची पूजा करतात. पूर्वी मूर्ती बहुदा एकमुखी असायची. हल्ली त्रिमुखी मूर्ती जास्त प्रचलीत आहे. दत्त हा 'गुरुदेव' आहे. दत्तात्रेयांना परमगुरु मानले आहे. त्यांची उपासना गुरुस्वरूपातच करावयाची असते. 'श्री गुरुदेव दत्त', 'श्री गुरुदत्त' असा त्यांचा जयघोष करतात. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' ही नामधून आहे.

दत्तात्रेयाच्या खांद्याला एक झोळी असते. तिचा भावार्थ याप्रमाणे आहे – झोळी हे मधुमक्षिकेचे (मधमाशीचे) प्रतीक आहे. मधमाशा जशा ठिकठिकाणी जाऊन मध गोळा करतात आणि तो एकत्र जमवितात, तसे दत्त दारोदारी फिरून झोळीमध्ये भिक्षा जमवतो. दारोदारी हिंडून भिक्षा मागितल्याने अहं लवकर कमी होतो; म्हणून झोळी ही अहं नष्ट झाल्याचेही प्रतीक आहे.

**दत्त जयंती उत्सव भावपूर्ण होण्यासाठी हे करा !**

अ. स्त्रियांनी नऊवारी साडी अन् पुरुषांनी सदरा–धोतर / पायजमा अशी सात्त्विक वस्त्रे परिधान करून उत्सवात सहभागी व्हावे.

आ. विद्यार्थ्यांसाठी 'श्रीदत्तात्रेयकवच' पठण ठेवावे, दत्ताचा नामजप करवून घ्यावा.

इ. उत्सवाच्या ठिकाणी कर्णकर्कश संगीत लावणे, विद्युत रोषणाईचा झगमगाट यांसारख्या रज–तम निर्माण करणाऱ्या कृती करू नयेत.

ई. दत्त जयंतीच्या मिरवणुकीत टाळ, मृदुंग अशी सात्त्विक वाद्ये वापरावीत.

**संदर्भ : सनातन–निर्मित ग्रंथ 'दत्त' भाग १, संकलन–दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**





## संत किसनगिरीनगर येथे गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई

संत किसनगिरी नगर येथे गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात श्री दत्त जयंती महोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दरवर्षी दत्त जयंतीचा महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. मंदिराचे आकर्षक विद्युत रोशनी बघण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. श्री दत्त जयंती महोत्सवा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या दत्त जयंती महोत्सवात भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा नगर भक्त सेवा मंडळाने केले आहे.

# ॐ शिव गोरक्ष योगी आस्थाना एमआयडीसीमध्ये दत्त जयंतीनिमित्त १४ डिसेंबर रोजी 'संतांचा मेळा'



नगर – निंबळक बोल्हेगाव रोड, एमआयडीसी येथील ॐ शिव गोरक्ष योगी आस्थानामध्ये १४ डिसेंबर रोजी दत्त जयंती उत्सवानिमित्त संतांचा मेळा आयोजित करण्यात आला असून दिवसभर विविध कार्यक्रम होणार असून ३ दिवसीय दत्त याग १०८ हवण कुंड यज्ञाची सांगता होणार आहे, अशी माहिती मठाधिपती अशोक भाऊ महाराज यांनी दिली

१४ डिसेंबर रोजी पहाटे ५ वा आरती होणार असून नंतर गुरुचरित पारायण होणार आहे. सकाळी ७ वा धुनी आरती नंतर हवन विधी सकाळी ८ ते ११ संत महंतांची मिरवणूक परिसरातून काढण्यात येणार आहे. दुपारी १२ वा जन्मोत्सव व महाआरती होणार असून नंतर महाप्रसाद होणार आहे व तीन दिवसीय दत्त यागाची सांगता होणार आहे.

अवघडपिर सतनाथजी महाराज यांच्या आशीर्वादाने गेल्या वर्षी दत्त जयंतीला ॐ शिव गोरक्ष योगी आस्थाना येथे नवीन बांधण्यात आलेल्या मंदिरात ६ फूट उंचीची मच्छिंद्रनाथ मूर्तीची स्थापना करण्यात आली. यावर्षी पहिला वर्धापन दिन व दत्त जयंती निमित्त तिन दिवसीय दत्त याग भव्य १०८ हवण कुंड यज्ञ १२ ते १४ डिसेंबरपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. तर अहिल्यानगरच्या पावन भुमिमध्ये प्रथमच संतांचा मेळा प्रथमच आयोजित केला आहे यामध्ये देशातून संत महंत येणार आहेत.

यावेळी आ. शिवाजीराव कर्डीले, आ. संग्राम जगताप, नगरसेवक कुमार वाकळे, माधवराव लामखडे, प्रियंका लामखडे, सरपंच, निंबळक, अविनाश कोतकर, लिंबा नागरगोजे आदींसह भाविक उपस्थित राहणार आहे.

भाविक भक्तांनी सालाबादप्रमाणे याहीवर्षीही ओम शिव गोरक्षनाथ योगी आस्थाना, श्री बडेबाबा मच्छिंद्रनाथ मंदीर, निंबळक, बोल्हेगाव रोड एसआयडीसी येथील महाप्रसाद, सतसंग कार्यक्रम व मिरवणुकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.





### दत्त याग भव्य १०८ हवण कुंड यज्ञ

अहिल्यानगरच्या पावन भुमिमध्ये प्रथमच ॐ शिव गोरक्ष योगी आस्थाना, निंबळक बोल्हेगाव रोड. एसआयडीसी येथे ३ दिवसीय दत्त याग करण्यात आला असून, यामध्ये भव्य १०८ हवण कुंड यज्ञ आहेत व १०८ जोड्या पूजेला बसल्या आहेत.

# भिंगार दत्तजयंती सोहळ्याच्या किर्तनात भाविक मंत्रमुग्ध

नगर – भिंगार गावातील वाघस्करगल्ली दत्तजयंती महोत्सवात पहिले पुष्प गुंफण्याचा मान मिळाला वांबोरी येथील तरूणी हभप ऋतुजाताई इंगळे यांना. त्यांनी निरूपणासाठी निवडलेला अभंग होता नाम वाचे श्रवण किर्ती । पाऊले चित्ती समान । काळ सार्थक केला त्यांनी । धरीला मनी विठ्ठल ।। यावर त्यांनी वेगवेगळी उदाहरणे देऊन श्रोत्यांना दोन तास मंत्रमुग्ध केले. त्यांना साथ दिली.



भिंगार येथील दत्तजयंती सोहळ्यात पहिले पुष्प गुंफताना हभप ऋतृजाताई इंगळे. समोर उपस्थित भाविक.

श्री. तांदळे, गरड, कराळे व कर्डीले या हभप गायणाचार्यांनी. मृदंगचार्य नरेंद्र सोळंके व रोहित अकोलकर होते. महत्वाचे म्हणजे निमगांव वाघा येथील नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेचे बालवारकरी विद्यार्थी यांनी किर्तनाबरोबर हरीपाठप्रसंगी टाळकरी भूमिका विविध नृत्यासह साथ दिली. त्यांचे सर्व श्रोत्यांनी कौतुक केले. हभप सौ. इंगळे यांचे मोहिते परिवाराच्या जयश्री वाघस्कर यांनी हार घालून स्वागत केले. प्राचार्य कैलास मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. १५ डिसेंबरला भागवताचार्य हभप शिवाजी महाराज कोकणे वडगांव गुप्ता यांच्या काल्याच्या किर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे, अशी माहिती ज्येष्ठ नागरिक ॲड.साहेबराव चौधरी पाटील यांनी दिली.

### श्री दत्तजयंती महोत्सवानिमित्त आगरकर मळ्यात १५ डिसेंबरला विविध कार्यक्रमाचे आयोजन

नगर – श्री सद्गुरु भक्त सेवा मंडळाच्यावतीने अर्बन बँक कॉलनी, आगरकर मळा, स्टेशन रोड येथे श्री दत्तजयंती महोत्सवानिमित्त १५ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये सकाळी ८ ते १० होम व अभिषेक, दुपारी १२ वा. महाआरती, दुपारी १ ते ५ या वेळेत महाप्रसाद, सायंकाळी ५ ते ७ या वेळात पालखी मिरवणूक, रात्री ८ ते १० या वेळेत महाप्रसाद, रात्री १० वा. शेजारती अशा कार्यक्रमांचा समावेश आहे. तरी सर्व भक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# टिव्ही सेंटर दत्त मंदिरात दत्त जयंती उत्सव व १६ डिसेंबरला महाप्रसाद



नगर – श्री दत्त मंदिर, तहसिल कार्यालयासमोर, सावित्रीबाई फुले कॉम्प्लेक्स, टिव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर येथे श्री दत्त जयंती उत्सव श्री गुरुचरित्र पारायण सोहळा सालाबाद प्रमाणे १४ डिसेंबर रोजी साजरा होत आहे, अशी माहिती विघ्नहर्ता प्रतिष्ठानचे संस्थापक योगेश सोनवणे पाटील यांनी दिली

शनिवारी सकाळी ७ ते ९ वा. गुरुचरित्र पारायण पारायण होणार असून सकाळी ९.३० वा. दत्तगुरूंच्या मूर्तीला अभिषेक होणार आहे. तर दुपारी ४ ते ६ वा. संगीत (भजनी मंडळ) कार्यक्रम होणार असून सायं. ६.३० वा. श्री दत्तात्रय जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. नंतर सायं ७ वा.प्रसाद वाटप होईल

तसेच १६ डिसेंबर रोजी दुपारी १२ ते ३ वा. मंदिर प्रांगणात महाप्रसाद भंडारा श्री दत्त मंदिर, तहसिल कार्यालयासमोर, सावेडी, येथे होणार आहे. तरी श्री दत्त जयंतीच्या सर्व कार्यक्रमांना भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# नगरच्या संयुक्ता काळेला स्केटिंगचे 'गोल्ड मेडल'

नगर – भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या जिल्हा रोलर स्केटिंग असोसिएशन सलग्न एम स्पोर्टस ॲकडमीच्या रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२४–२५ स्पर्धेत संयुक्ता सचिन काळे हिने 'गोल्ड मेडल' पटकवले. यापूर्वी झालेल्या स्पर्धेत तिला रौप्यपदक होते.



प्राचार्या दीपीका नगरवाला यांच्या हस्ते संयुक्ता काळे हिचा विशेष सत्कार करण्यात आला.

ती आयकॉन पब्लिक स्कूलची विद्यार्थीनी आहे. ती ५ ते ७ या वयोगट गटात खेळली होती. भिंगार येथे झालेल्या स्पर्धा जिल्हा रोलर संघटनेचे सहसचिव सतीष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. प्रमोद डोंगरे आणि शुभम कर्पे या टीमच्या प्रशिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. अहिल्यानगरसह, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे जिल्ह्यातील टीम या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. आयकॉन पब्लिक स्कुलच्या प्राचार्या दीपीका नगरवाला यांच्या हस्ते आणि वर्गशिक्षिका अनुश्री महाजन यांच्या उपस्थितीत संयुक्ता काळे हिचा सत्कार करण्यात आला.

# चौरंगावरील देवपूजा करण्यापेक्षा दिव्यांगांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा

### न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांचे प्रतिपादन

नगर – चौरंगावरील देवपूजा करण्यापेक्षा दिव्यांगांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. पालकांनी खचून न जाता, तुम्ही सक्षम असल्यानेच हे विशेष मूल देवाने तुमच्या पदरात टाकले आहे. या विशेष मुलांना दिशा देऊन त्यांचे भवितव्य घडविण्याचे न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांनी आवाहन केले. तर या मुलांबाबत शासकीय कामांमध्ये काही अडचणी आल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या माध्यमातून मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

टिळक रोड येथील मतिमंद विकास शिक्षण मंडळ संचलित मतिमंद मुलांच्या शाळेत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मतिमंद मुलांची शाळा आणि ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटी कार्यशाळेच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक अक्षम दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमातून बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या पालकांचे मनोबल उंचाविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.



मतिमंद मुलांच्या शाळेत बौद्धिक अक्षम दिन साजरा करण्यात आला.

बौद्धिक अक्षम दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव तथा न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एम.पी. पांडे, सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) ए.व्ही. ढोरे, मतिमंद विकास शिक्षण मंडळाचे ज्येष्ठ संचालक अविनाश कुलकर्णी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश वैकर, शालेय व्यवस्थापन समितीचे खजिनदार उदय भनगे उपस्थित होते.

न्यायाधीश एम. पी. पांडे म्हणाले की, बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या क्षमता असून, ते ओळखण्याची गरज आहे. ही मुले कुठेही कमी नाहीत, एकमेकांच्या हातात हात घेऊन प्रत्यक्ष स्पर्धेत ते उतरतात. थक्क करणारे कौशल्य त्यांच्यात असून, त्याला चालना देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

न्यायाधीश ए.व्ही. ढोरे यांनी पालकांना दिव्यांग व्यक्तीचे अधिकार आणि दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम २०१६ याबद्दल कायदेशीर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यशाळेचे प्रमुख भाऊसाहेब कदम यांनी केले. पाहुण्यांचा परिचय निदेशक सुशीला जाधव यांनी करून दिला. बौद्धिक अक्षम दिनाचे महत्त्व शाळेचे वाचा उपचार तज्ञ विक्रम उंडे यांनी सांगितले.

सूत्रसंचालन शाळेच्या विशेष शिक्षक पुष्पा बनकर यांनी केले. आभार संस्थेचे संचालक अविनाश कुलकर्णी यांनी मानले.

# रब्बी हंगामातील 'प्रधानमंत्री पीक विमा योजने'चा शेतकऱ्यांना लाभ घेण्यासाठी १५ डिसेंबर अंतिम मुदत

मुंबई – राज्य शासनामार्फत रब्बी हंगामामध्ये देखील शेतकऱ्यांना एक रूपयात पीक विमा योजना लागू केली आहे. तरी शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आपल्या रब्बी हंगामातील गहू, हरभरा, कांदा पिकाचा विमा उतरवावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर आहे.

राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना २०१६–१७ पासून राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२३ पासून महाराष्ट्र शासनामार्फत एक रूपयात पीक विमा योजना लागू केली आहे. याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे. चालू रब्बी हंगाम २०२४–२५ मध्ये योजनेचा लाभ घेण्यासाठी केंद्र सरकारच्या पीक विमा पोर्टल www.pmfby.gov.in या संकेतस्थळास भेट द्या.महाराष्ट्रात रब्बी हंगामातील गहू, हरभरा तसेच रब्बी कांदा पिकासाठी भाग घेण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर आहे. तर उन्हाळी भात व उन्हाळी भुईमुग या पिकांसाठी ही मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत आहे. गतवर्षी रब्बी हंगाम २०२३–२४ मध्ये विमा योजनेत साधारणता ७१ लाख विमा अर्ज प्राप्त झाले होते.

### अरणगावच्या वर्का स्कूलमध्ये १५ डिसेंबरला 'तारांगण आणि कोल्ड मून' पाहण्याची संधी

नगर – अरणगाव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज आणि फिनिक्स स्कूलतर्फे रविवारी (दि.१५) टेलिस्कोपद्वारे सरत्या वर्षाचा शेवटचा 'कोल्ड मून' पाहण्याची संधी उपलब्ध करण्यात आली आहे.

यासाठी प्रवेश सर्वांसाठी मोफत राहील. सायंकाळी ५.३० ते ९.३० पर्यंत वर्का स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज, अरणगाव येथे ही संधी उपलब्ध करण्यात आली आहे. यामध्ये तारे पाहण्याचे कौशल्य प्राप्त करता येईल. तसेच तारे निरीक्षणाचे विविध व्हिडिओज पहाता येतील. तरी लवकरात लवकर आपले रजिस्ट्रेशन करून या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा. रजिस्ट्रेशनसाठी मो. ९८२२४०८२३७ किंवा ९२२५३२५०९९



जुन्या सायकलचे 'इलेक्ट्रिक'मध्ये रूपांतर केल्याचे छायाचित्रात दाखविताना 'रामकृष्ण'वर विद्यार्थी मयांक दिवटे.

# जुन्या झालेल्या सायकलचे श्रीरामकृष्णच्या विद्यार्थ्याने केले 'इलेक्ट्रिक'मध्ये रूपांतर

नगर – श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मिडीयम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्यूनिअर कॉलेज मधील इयत्ता १२ विज्ञान शाखेतील चि. मयांक हेमंत दिवटे या विद्यार्थ्यांने चिकित्सक वृत्तीने जुन्या झालेल्या सायकलचे इलेक्ट्रिक सायकलमध्ये रूपांतर केले आहे. नुकत्याच शाळेत झालेल्या विज्ञान प्रदर्शनात त्याचा हा आविष्कार सगळ्यांना पहायला मिळाला.

विद्यार्थी मयांक याने जुनी झालेली सायकल व्यवस्थित दुरुस्त करून तिला लिथियम बॅटरी लावून ई–सायकल बनवले. ही सायकल एका चार्जिंगमध्ये २५ किलो मीटरपर्यंत धावते. या सायकलला २५ किमी प्रती तास असा वेग मिळतो. या वैज्ञानिक संशोधन आणि प्रात्यक्षिकासाठी त्याला संस्थेच्या मुख्याध्यापिका सौ. राधिका जेऊरकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच पालक श्री. व सौ. शिल्पा हेमंत दिवटे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रदर्शनात मयांकची ही ई सायकल पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर, संस्थेचे सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, कार्यकारिणी सदस्य अशोक बार्शीकर, रवींद्र गुजराथी, पुरुषोत्तमभाई पटेल, रामसुख मंत्री, श्रीगोपाल जाखोटिया, अरुण झंवर, शाळेच्या प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर, उपप्राचार्य संपदा देशपांडे, समन्वय सुषमा उजागरे, श्रेयश गुंडू आदींनी मयंक याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# जळगाव येथील आर.एस.बाफना ज्वेलर्सच्या नूतन दालनाचा अहिल्यानगर येथे शुभारंभ

## ५० वर्षांपासून ग्राहकांच्या आवडीची सुवर्णपरंपरा आता नगरवासियांच्या सेवेत दाखल





आर. एस. बाफना ज्वेलर्सच्या नूतन अलंकार दालनाचा शुभारंभ झाल्यानंतर ग्राहकांची झालेली गर्दी.

नगर – पारदर्शकता, शुद्धता आणि विश्वासाचे प्रतीक असलेल्या तसेच गेल्या ५० वर्षांपासून सातत्याने ग्राहकांच्या पसंतीस उतरलेल्या मूळ जळगाव येथील 'आर. एस. बाफना ज्वेलर्स'चा उद्घाटन समारंभ अहिल्यानगर येथे नगरवासियांच्या आणि उपस्थितांच्या हस्ते उत्साहात पार पडला. १२ डिसेंबर रोजी सावेडी नाका, सावेडी, इम्पल्स हॉस्पिटलजवळ, अहिल्यानगर येथे दुपारी १२.३० वाजता सदर शुभारंभ सोहळा दालनाच्या नव्या इमारतीमध्ये झाला. आर. एस. बाफना ज्वेलर्स हे अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वांत मोठे अलंकारिक दालन आहे. सध्या 'आर. एस. बाफना समूह' आपल्या सुवर्णपरंपरेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे. सुवर्णपेढीची शाखा अहिल्यानगर येथे सुरु झाल्यापासून येथील ग्राहक 'आर. एस. बाफना ज्वेलर्स'ला प्रथम पसंती देतील याची खात्री आहे, असे संचालक राहुल बाफना यांनी सांगितले आहे.

अहिल्यानगरवासियांना संपूर्ण पारदर्शक व १००% संतुष्टी देणारी ग्राहकसेवा बहाल करण्यासाठी आर. एस. बाफना ज्वेलर्स कटिबद्ध आहे. सोन्याच्या सर्वांत कमी किंमती व घडणावळीचे सर्वाधिक वाजवी दर 'आर. एस. बाफना ज्वेलर्स' येथे बघायला मिळतील. सर्व अलंकारांवर BSI चे हॉलमार्किंग केलेले आहे. आर. एस. बाफना ज्वेलर्समध्ये दालनातील सोन्याची व हिऱ्यांची किंमत, घडणावळ शुल्क व जीएसटीचा संपूर्ण ब्रेकअप दिला जातो, कोणतेही छुपे शुल्क न घेता संपूर्ण पारदर्शकता जपणे हे त्यांचे ब्रीद आहे.

याशिवाय मोफत सोने शुद्धता तपासणी, बायबॅकची हमी, जीवनभरासाठी मोफत देखभाल अशा सुविधाही ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. 'आर. एस. बाफना ज्वेलर्स'च्या अहिल्यानगर येथील नव्या भव्य दालनात पारंपरिक व आधुनिक दागिन्यांची अप्रतिम व्हरायटी, जिव्हाळ्याची सेवा व संपूर्ण ग्राहक समाधानाची हमी आहे. शुभारंभानिमित्त १८ व २२ कॅरेट सोन्याचे दागिने खरेदी केल्यास त्याच्या मजुरीवर २५% सूट मिळणार आहे. १२ ते ३१ डिसेंबरपर्यंत ही ऑफर ग्राहकांसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे अहिल्यानगरवासियांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक राहुल बाफना यांनी केले आहे.

# जीवन वाचवायचे असेल तर शारीरिक कसरत महत्त्वाची

### डॉ. रेखा झावरे यांचे प्रतिपादन

नगर – विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारज्ञान आवश्यक आहे. जगात टिकायचे असेल तर आलेल्या संकटावर मात करून पुढे जात रहावे व स्वतःमध्ये बदल करा. मोबाईल व टीव्हीमध्ये गुंतून जात मैदानी खेळ खेळा, शरीरी व्यायाम केले पाहिजे. आपल्याला आपले जीवन वाचवायचे असेल तर शारीरिक कसरत केली पाहिजे. जंग फूड व फास्ट फूड खाणे टाळा, आणि पोषक आहार खाण्याचे डॉ. रेखा झावरे यांनी आवाहन केले.



केडगावच्या सरस्वती प्राथमिक विद्यामंदिरात बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

## केडगावच्या सरस्वती प्राथमिक विद्यामंदिरात बाल आनंद मेळावा उत्साहात

केडगाव येथील डॉ. हेडगेवार शैक्षणिक संकुल संचलित सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता आणि कौशल्य विकास होण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आनंद लुटला. यावेळी मुलांनी भेळ, पॅटिस, पाणीपुरी, ढोकळा, इडली, मॅगी तसेच शरीरासाठी पोषक असे पालेभाज्या व फळे हेही विक्रीसाठी आणण्यात आले होते.

या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन डॉ. अक्षयदीप झावरे व डॉ. रेखा झावरे यांच्या हस्ते झाले. शालेय समितीचे सदस्य संभाजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी बी.एड. कॉलेजचे प्राचार्य अमरनाथ कुमावत, मुख्याध्यापक संदीप भोर, मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी, विद्या भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी, प्रज्ञाताई आसनिकर, प्रा. मनोज कोतकर, विद्या भारतीचे सहमंत्री दादासाहेब काजळे, पालक प्रतिनिधी अनिलराजे झिरपे, अवि साठे, शिवाजी मगर आदींसह सर्व शालेय शिक्षक, कर्मचारी व पालक उपस्थित होते.

प्रास्ताविक मुख्याध्यापक संदीप भोर यांनी केले. या बाल आनंद मेळाव्यात विविध साहित्याचे प्रदर्शन, समाजिक संदेश देणाऱ्या रांगोळ्या, आणि विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान होण्यासाठी विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल थाटण्यात आले होते. विविध उद्योगांवर आधारित प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. सूत्रसंचालन स्मिता खिलारी यांनी केले. आभार अनिता क्षीरसागर यांनी मानले. सर्व शिक्षकानी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# तेली समाजाचा १५ डिसेंबरला नगरमध्ये नि:शुल्क वधू–वर पालक परिचय मेळावा

### शहर व जिल्हा समाज, संताजी विचार मंच आणि प्रादेशिक महासंघाचा उपक्रम

नगर – अहिल्यानगर शहर व जिल्हा तेली समाज व संताजी विचार मंच (ट्रस्ट) आणि प्रदेश तेली महासंघाच्या वतीने १५ डिसेंबर रोजी मोफत वधू–वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सावेडी येथील माऊली संकुल सभागृहात होणाऱ्या या मेळाव्यात सर्व समाजबांधवांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मागील सात वर्षापासून मेळाव्याचे आयोजन केले जात असून, या मेळाव्याच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील तेली समाज बांधव एकत्र येतात. दरवर्षी या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतो. यावर्षी देखील भव्य स्वरुपाचे नियोजन करण्यात आले आहे.

पंधराशे वधू–वर असलेली फोर कलर पुस्तिका मेळाव्यातील वधू–वर पालकांना उपलब्ध होणार आहे. या मेळाव्यात स्वत: वधू–वर उपस्थित राहणार आहेत.

तसेच या मेळाव्यात सहभागी झालेल्या बांधवांसाठी सोडत पध्दतीने अनुक्रमे ३२ इंची एलईडी टीव्ही, वधूसाठी पैठणी साडी व वरास सुट फॅब्रिक आणि वधू–वरास रिस्ट वॉचचे बक्षीस दिले जाणार आहे.


## अहमदनगर महानगरपालिका, अहिल्यानगर

# जाहीर आवाहन

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व जमीन व इमारती यांचे सक्षण करुन आवश्यक माहिती संकलीत करणे. मुल्यांकन व आवश्यक तांत्रीक सेवा, संगणकीकरण करणे विविध आज्ञावली विकसीत करुन इतर अनुषंगिक कामे करणे बाबत निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार महानगरपालिका स्तरावर विविध प्रक्रिया राबवुन कामाचे कार्यादेश देण्यात आलेले असुन मालमत्तेची डिजीटल छायाचित्रे, जिओ टॅगींग तसेच मिळकतीची अंतर्गत मोजमापांसाठी आणि त्यांचे कारपेट / बिल्डअप क्षेत्र डीजीटल उपकरण मोजमापणाद्वारे मोजमाप करण्यात येणार आहे. सदरचे संपूर्ण कामकाज वसुली लिपिक व मे. सिई इन्फो सिस्टीम लिमिटेड यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष उपस्थितीत सुरु करण्यात आलेले असून खालील नमुद केल्यानुसार कामाकाजास सुरुवात करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रभाग समिती कार्यालय – २ माळीवाडा कार्यालय अंतर्गत | वॉर्ड क्रमांक– १ वसुली लिपिक श्री. आमले बहिरू | दिल्लीगेट, मानकर गल्ली, नालेगाव, वाघ गल्ली, गाडगीळ पटांगण यासह इतर परिसर |
| | वॉर्ड क्रमांक– २ वसुली लिपिक श्री. आमले बहिरू | तोफखाना, पंचरंग गल्ली, नवरंग व्यायम शाळेच्या समोरील भाग, शितळादेवी मंदीर परिसर यासह इतर परिसर |
| | वॉर्ड क्रमांक– ३ वसुली लिपिक श्री. आमले बहिरू | बागडपट्टी, शेरकर गल्ली तेलीखुंट, कापड बाजार मिसाळ गल्ली, परनाईक गल्ली यासह इतर परिसर |
| | वॉर्ड क्रमांक– ८ वसुली लिपिक श्री. देवकर शशिकांत | कापड बाजार, अर्बन बँक रोड, नवीपेठ, गांधी मैदान, तांबटकर गल्ली, पानसरे गल्ली यासह इतर परिसर |
| | वॉर्ड क्रमांक– १४ वसुली लिपिक श्री.साबळे सुर्यकांत | घुमरे गल्ली, जुना बाजार, माणकेश्वर गल्ली, माणिक चौक, परदेशी गल्ली, माणिक चौक यासह इतर परिसर |
| प्रभाग समिती कार्यालय क्रमांक – १ सावेडी | वॉर्ड क्रमांक– ४९ वसुली मदतनीस श्री. अवघडे शंकर | सावेडी नाका,सहकार नगर, सावेडी गावठाण, साई संकल्प नगर यासह इतर परिसर |
| | वॉर्ड क्रमांक– ५१ वसुली मदतनीस श्री. देशमुख रफिक | श्रमिक नगर, मोरया कॉलनी, हनुमान नगर, रेणावीकर कॉलनी यासह इतर परिसर |
| | वॉर्ड क्रमांक– ६८ श्री. सप्रे प्रदिप | रेणुका नगर, प्रेम भारती नगर, सोनचाफा रो हौसिंग यासह इतर परिसर |
| | वॉर्ड क्रमांक– ७६ वसुली लिपिक श्री. सप्रे प्रदिप | नंदनवन नगर, बारस्कर नगर, आठरे पाटील शाळा परिसर पवन नगर यासह इतर परिसर |
| | वॉर्ड क्रमांक– ७७ वसुली मदतनीस श्री. नागापुरे परशुराम | कजबे वस्ती, कुशाबा नगरी, लाल गुलाब कॉलनी, व्यंकटेश कॉलनी, गौरव कॉलनी |
| | वॉर्ड क्रमांक– ७९ वसुली लिपिक श्री. शेंडे राहुल | भिस्तबाग, ढवण वस्ती, फणसे मळा, गावडे मळा, लेखा नगर यासह इतर परिसर |

उपरोक्त दर्शविल्यानुसार वसुली लिपिक यांचे उपस्थितीत काम होणार आहे.

तरी उक्त भागातील मालमत्ता धारकांनी मालमत्ता सर्व्हेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख तपासुन त्यांना मालमत्ता कर सर्व्हेक्षणासाठी सहकार्य करावे आणि त्यांना आवश्यक ती माहिती देण्यात यावी. सदरचे सर्वेक्षणाचे काम हे अहिल्यानगर महानगरपालिका विनामुल्य करत असून याकामी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नसल्याचे याद्वारे सूचित करण्यात येत आहे. सर्वेक्षणाच्या कामकाजाच्या पूर्तते नंतर मालमत्ता धारकांना आवश्यक असलेल्या नागरिकांच्या मुलभुत सुविधांमध्ये सुधारणा करणे महानगरपालिकेस शक्य होणार आहे.

या सर्व्हेक्षणाबाबत अथवा सर्वेक्षणकामास येणाच्या कर्मचारी यांच्या विषयी कुठलीही तक्रार असल्यास amc_anr@rediffmail.com व amc.revision2@gmail.com या ई–मेल आयडी वर करावी. तसेच सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी श्री.विनायक गंगाधर जोशी यांच्याशी ९८२२०७६८६५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करू शकाल असे आवाहन मा. आयुक्त साहेब अहिल्यानगर महानगरपालिका यांचे वतीने करण्यात येत आहे.

प्रसिद्धी विभाग जा.क्र. ५२०
दि. १२.१२.२०२४

**आयुक्त**
अहिल्यानगर महानगरपालिका


# परभणीतील संविधान शिल्पाच्या अवमानाचा नगरमध्ये तीव्र निषेध

### दोषी व माथे भडकविणाऱ्या समाजकंटकांवर कारवाई करा; जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन



दोषी व माथे भडकविणाऱ्या समाजकंटकांवर कारवाई करा, या मागणीचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षकांना देताना वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी.

नगर – परभणी येथे संविधानाच्या शिल्पाची झालेल्या तोडफोड प्रकरणाचा निषेध नोंदवून या प्रकरणातील दोषींना व माथे भडकविण्याचे काम करणाऱ्या समाजकंटकांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे निवेदन देण्यात आले. संविधानाचा अवमान खपवून घेतला जाणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, शहराध्यक्ष हनिफ शेख, संघटक शफी शेख, सल्लागार जे.डी. शिरसाठ, महासचिव अमर निरभवणे, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, शरद वाघुंबरे, देवीदास भालेराव आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सध्या देशात आणि राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडविण्याचे काम सुरू आहे. सरकारकडून अशा अनेक घटना आळा घालण्यासाठी आवश्यक प्रयत्न होताना दिसून येत नाहीत, उलटपक्षी अशा प्रकरणातील दोषींना पाठबळ देण्याचे काम सरकार करताना दिसत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे.

परभणी येथे संविधानाच्या शिल्पाची झालेल्या तोडफोड प्रकरणानंतर दलित वस्तीमध्ये कोंबिंग ऑपरेशन करून विनाकारण दलित बांधवांना त्रास देण्याचे काम केले जात आहे. यामुळे संविधान विरोधी शक्तींची हिम्मत वाढत आहे. याचाच परिणाम म्हणून १० डिसेंबर रोजी परभणी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा परिसरात संविधानाच्या प्रतिमेची अवमान करणारी संतप्त घटना घडली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तर संविधानाच्या शिल्पाची झालेल्या तोडफोड प्रकरणाचा निषेध नोंदवून या प्रकरणातील दोषींना व माथे भडकविण्याचे काम करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. फुले, शाहू, आंबेडकरवादी विचारांच्या सर्व सुज्ञ नागरिकांनी आणि युवा वर्गाने कोणत्याही खोट्या अफवेला बळी पडू नये. सोशल मीडियावर प्रसारित झालेला कोणतेही पोस्ट अथवा बातमीची शहानिशा करावी. सध्या माथे भडकविण्याचे काम समाकंटक करत आहे, असे योगेश साठे यांनी म्हटले आहे.

# अहिल्यानगर शिक्षण विभागाचे कामकाज राज्यात अव्वल



रविंद्र गावडे

नगर – महाराष्ट्र शासनाने १४ ऑक्टोबर रोजी राज्यातील सुमारे ६३ हजार शिक्षकांसाठी ११०० कोटी रुपये अनुदान देण्याचा शासन निर्णय निर्गमित केला. सदर अनुदान राज्यातील सुमारे २०–२० वर्ष विनावेतन काम करणाऱ्या शिक्षकांना संजीवनी देणारा ठरला. सदर कामकाज राज्य शासनाने जलद गतीने व्हावे म्हणून शासनाने शासन निर्गमित करून शिक्षण आयुक्त तसेच शिक्षण संचालनालय यांना पत्र देऊन सदर शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून समाजामध्ये पिढी घडवणाऱ्या शिक्षक वर्गाला दिलासा द्यावा आणि लवकरात लवकर माहिती सादर करून अनुदान वितरण करण्यासाठी मार्ग मोकळा करावा.

या दृष्टिकोनातून शिक्षण संचालनालय स्तरावरून पत्र निर्गमित झाले त्या दृष्टिकोनातून राज्यातील सर्व उपसंचालक तसेच शिक्षणाधिकारी कार्यालयाने शाळेंना माहिती मागवण्यासाठी पत्र काढले सदर माहिती ही शिक्षणाधिकारी स्तरावर देखील उपलब्ध आहे. तरी देखील शिक्षकांकडून माहिती घ्यायची किंवा शाळेकडून माहिती घ्यायची या दृष्टिकोनातून विविध परिपत्रके काढून कागदी घोडे नाचवण्याचा प्रयत्न केला परंतु राज्यातील एकमेव अहिल्यानगर जिल्हा परिषद अशी आहे की शाळेला कुठल्याही प्रकारचे पत्र न काढता सर्व माहिती आपल्या स्तरावर उपलब्ध आहे तिचे संकलन करून सदर माहिती ही तात्काळ शिक्षण संचालनालयाला पाठवली व राज्यात आदर्शवत उपक्रम राबविला त्याबद्दल अहिल्यानगर माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोकराव कडूस यांचे विशेष अभिनंदन तसेच त्यांना सहकारी करणारे उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, शिक्षण निरीक्षक श्रीराम थोरात, विस्ताराधिकारी सुरेश ढवळे, महानगरपालिकेचे विषय तज्ञ अरुण पालवे आदी अधिकाऱ्यांनी रात्रंदिवस वेळ देऊन विहित वेळेत कामकाज पूर्ण केले त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांमध्ये सर्व अधिकाऱ्यांविषयी अभिमानाची तसेच समाधानाची भावना निर्माण झाली आहे.

अनुदान मिळवण्यासाठी प्रयत्न करणारे राज्यमंत्री दर्जा प्राप्त आमदार डॉक्टर श्रीकांत देशपांडे, मुंबई विभागाचे शिक्षक आमदार ज.मो. अभ्यंकर, नाशिक विभागाचे पदवीधर आमदार सत्यजित तांबे, शिक्षक आमदार किशोर दराडे, शिक्षक आमदार जयंत आसगावकर, संभाजीनगर विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे, कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय अच्युतराव सावंत सर, माजी आमदार बाळाराम दत्तात्रेय पाटील अशी माहिती शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष रविंद्र गावडे यांनी दिली.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये जगभरातील वैज्ञानिकांनी भूकंपीय हालचालींवर नजर ठेवणाऱ्या उपकरणांवर आश्चर्यकारक सिग्नल्स पाहिले होते. हे असे सिग्नल्स होते, ज्यांना यापूर्वी कधीही पाहण्यात आले नव्हते. आर्क्टिकपासून अंटार्क्टिकापर्यंत अशा सिग्नल्सची प्रत्येक ठिकाणी नोंद करण्यात आली. भूकंपाच्या गडगडाटाशिवाय हे सिग्नल्स केवळ एक व्हायब्रेशन फ्रीक्वेन्सीसह सातत्याने येत होते. हा प्रकार तब्बल नऊ दिवस सुरू राहिला होता. आता त्याचे रहस्य उलगडण्यात संशोधकांना यश आले आहे.

## उलगडले रहस्यमय सिग्नल्सचे गूढ



जर्मनीच्या ब्लॅक फॉरेस्ट वेधशाळेत त्यावेळी हजर असलेले डॉ. रुडॉल्फ विडमर यांनी सांगितले की गेल्या २२ वर्षांपासून वेधशाळेत काम करीत असताना मी जे पाहिले होते, त्यापेक्षा हे सिग्नल्स वेगळे होते. विशेष म्हणजे हे सिग्नल्स नऊ दिवस प्रत्येक काही तासांनंतर रिपीट होत होते. संशोधकांनी या घटनेला एक अज्ञात भूकंपीय वस्तू (यूएसओ) म्हणून वर्गीकृत केले.

या सिग्नल्सनी वैज्ञानिकांना चकीत तर केलेच, पण चिंतेतही टाकले. अशा स्तराचे सिग्नल काही मोठ्या गोष्टींमुळे होऊ शकतात, पण अशा काही कमीच गोष्टी आहेत ज्या असे सिग्नल्स उत्पन्न करू शकतात. ज्वालामुखी किंवा टेक्टॉनिक अस्थिरता किंवा एखाद्या अज्ञात शस्त्र परीक्षणाचाही हा संकेत असू शकतो. दुसरी एक शक्यता म्हणजे ही एक दुर्लभ भूवैज्ञानिक प्रक्रिया असू शकते, ज्याबाबत विज्ञानाला अद्याप माहिती नाही. या घटनेनंतर अद्यापही भूकंप वैज्ञानिक त्याबाबतचा तपास करीत होते. आता एक वर्षाने वैज्ञानिकांनी याबाबतचे रहस्य उलगडण्यात यश मिळवले आहे. त्याबाबतची माहिती 'सायन्स' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. पंधरा देश आणि ४० संस्थांच्या वैज्ञानिकांनी या रहस्यमय सिग्नल्सचे कारण शोधण्यासाठी आपली संसाधने आणि डेटा गोळा केला.

युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनचे भूकंप वैज्ञानिक आणि या संशोधनाचे प्रमुख संशोधक स्टीफन हिक्स यांनी सांगितले की सुरुवातीला याबाबतची अतिशय कमी माहिती उपलब्ध असल्याने त्यावेळी या घटनेचे वर्गीकरण 'यूएसओ' च्या रुपात करण्यात आली होती. प्रारंभिक परिणामांनी सांगितले की हे सिग्नल्स पूर्व ग्रीनलँडमधून येत होते. ज्यावेळी भूकंप वैज्ञानिकांना सिग्नल्सबाबत समजले, त्यावेळी डेन्मार्कच्या सैन्याला डिक्सन फ्योर्डमध्ये सुनामीची माहिती मिळाली होती.

सैन्याने त्यानंतर तिकडे एक जहाज पाठवले. तिथे एका ग्लेशियरचे नुकसान झाल्याचे आढळले जे केवळ २०० मीटर उंचीच्या मेगा-सुनामीमुळे होऊ शकत होते. वैज्ञानिकांना आढळले की एक मोठे भूस्खलन झाले होते, ज्यामध्ये एक डोंगर खचून तो ग्लेशियरमध्ये गेला होता. मात्र सुनामी आल्यावर सलग नऊ दिवस सिग्नल्स का येत होते, याचेही कोडे होतेच. सॅटेलाईट व ड्रोनच्या प्रतिमा तसेच पूर्वीच्या व नंतरच्या छायाचित्रांना, डेटा आणि सुनामीच्या सिमुलेशनला जोडून टीमने शोधले की हे सिग्नल एका घटनेमुळे आले होते, जिला 'सीशे' असे म्हटले जाते. ही घटना अशा वेळी होते ज्यावेळी पाण्याला सरोवरासारख्या जलाशयात एका बाजूने दुसरीकडे ढकलले जाते. डॉ. हिक्स यांनी सांगितले हवामान बदलामुळे हे भूस्खलन झाले.

गेल्या काही दशकांमध्ये ग्लेशियर तीस मीटरपर्यंत आकसले होते. त्यामुळे डोंगराचा आधार कमजोर झाला आणि तो कोसळला. त्यामुळे पृथ्वीमध्ये कंपन निर्माण झाले आणि भूकंपीय लहरी निर्माण होऊन त्या जगभर जाणवल्या. पृथ्वीचे तापमान जसे वाढत जाईल, तसे अशा स्वरूपाच्या घटनाही वाढत जातील, असा इशाराही वैज्ञानिकांनी दिला आहे.

## ब्रोकोली की फ्लॉवर, काय अधिक गुणकारी ?



आपल्याकडे आता अनेक नव्या वाटणाऱ्या भाज्याही रूळू लागल्या आहेत. कोथिंबिरीसारखी दिसणारी पार्ली असो किंवा फ्लॉवरसारखी दिसणारी ब्रोकोली, यूट्यूब – टीव्हीवरच्या रेसिपी शोमुळे त्यांची ओळख सर्वांनाच झाली. ब्रोकोली आणि फ्लॉवर या दोन भाज्या एक सारख्याच दिसत असल्याने खरेदी करताना कोणती भाजी जास्त आरोग्यदायी आहे हे कळत नाही. आता याबाबत आहारतज्ज्ञांनी काही माहिती शेअर केली आहे.

**ब्रोकोली आणि फ्लॉवरमध्ये काय फरक आहे? :** या भाज्यांमधील सर्वात उल्लेखनीय फरक म्हणजे त्यांचा रंग आणि आकार, ब्रोकोलीचा रंग गडद हिरवा असतो आणि त्याची फुलं पसरलेली असतात, जवळजवळ लहान झाडासारखी असतात. दुसरीकडे, फ्लॉवर पांढरा असतो. फ्लॉवरच्या चव आणि पौष्टिक मूल्यांमध्ये थोडा फरक आहे. ब्रोकोली एक पौष्टिक भाजी असून भाजीचे अनेक आरोग्यदायी फायदे देते. पोषणतज्ज्ञांच्या मते, ब्रोकोली फायबर आणि प्रथिनांचा एक उत्तम स्रोत आहे. १०० ग्रॅम ब्रोकोलीच्या सेवनाने सुमारे ३ ग्रॅम फायबर आणि २ ग्रॅम प्रोटीन असते. याव्यतिरिक्त, ब्रोकोलीमध्ये औटऑक्सिडंट्स आणि सूक्ष्म पोषक घटक जसे की जीवनसत्त्वे ए आणि सी आणि लोह भरपूर असतात. एकूणच, ब्रोकोली तुमच्या दैनंदिन आहारात एक अप्रतिम भर घालते. फ्लॉवर एकंदर आरोग्यासाठी उत्तम आहे. पोषणतज्ञ स्पष्ट करतात की, या भाजीमध्ये कॅलरीज्? कमी आहेत, १०० ग्रॅम सेवनात फक्त २७ कॅलरीज् आहेत. शिवाय, त्यात फक्त ४ ग्रॅम कार्बोहायड्रेट असते. शिवाय फ्लॉवरमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते आणि ब्रोकोली प्रमाणेच, फ्लॉवरदेखील फायबर व प्रथिनांचा एक चांगला स्रोत आहे.

**ब्रोकोली आणि फ्लॉवर यांच्यातील आरोग्य गुणानुसार कोणते निवडायचे? :** वर नमूद केलेल्या माहितीवरून, हे गोंधळात टाकणारे असू शकते, कारण दोन्ही अनेक आरोग्य फायदे देतात. आहारतज्ज्ञाच्या म्हणण्यानुसार, फायबर आणि प्रोटीनच्या बाबतीत ब्रोकोली सरस आहे. फ्लॉवरमध्ये १०० ग्रॅम सर्व्हिंगमध्ये २.३ ग्रॅम फायबर आणि १.८ ग्रॅम प्रोटीन असते, जे ब्रोकोलीपेक्षा थोडे कमी असते. दुसरीकडे, ब्रोकोलीमध्ये ३५ कॅलरीज् आणि ४ ग्रॅम कर्बोदकांसह कॅलरी आणि कर्बोदकांमधे जास्त असते. एकूणच, दोन्ही भाज्या चांगल्याच आहेत. त्यांच्या पौष्टिक मूल्यांमध्ये मात्र थोडासा फरक आहे.

## चर्चा अंबानींच्या जेटची



मुकेश अंबानी व त्यांच्या कुटुंबीयांच्या श्रीमंतीची चर्चा देश-विदेशात होत असते. अलीकडेच त्यांचा धाकटा मुलगा अनंत व राधिका मर्चंट यांचा शाही विवाहसोहळा आणि लालबागच्या राजाला अर्पण केलेला वीस कोटींचा मुकूटही चर्चेत होता. भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी अंबानी कुटुंब केवळ त्यांच्या आलिशान कार कलेक्शनसाठी नाही, तर अनेक खासगी जेटही आहेत. मुकेश अंबानींनी अलीकडेच भारतातील पहिले बोईंग बीबीजे ७३७ मॅक्स ९ खासगी जेट खरेदी केले, जे कधीही न पाहिलेले आहे. अल्ट्रा लाँग रेंज बिझनेस जेट बोइंग ७३७ मॅक्स ९ ची किंमत सुमारे एक हजार कोटी रुपये असून कोणत्याही भारतीय व्यावसायिकाने खरेदी केलेले आतापर्यंतचे हे सर्वात महागडे खासगी विमान आहे. मुकेश अंबानींनी या खासगी जेटमध्ये मोठे फेरबदल केले आणि नुकतेच आपल्या कलेक्शनमध्ये जोडले. १३ एप्रिल २०२३ पासून या जेटमध्येसुधारणा आणि चाचणी उड्डाणांची प्रक्रिया सुरू झाली होती ज्यामध्ये सहा चाचणी उड्डाणे करण्यात आली. या जेटमध्ये दोन शक्तिशाली इंजिन बसवण्यात असून ते बोईंगच्या रेंटन उत्पादन प्रकल्पात तयार केले जाते. या प्रायव्हेट जेटच्या केबिनवर अंबानी कुटुंबाने शेकडो कोटी रुपये खर्च केले असून गरजेनुसार जेट तयार करण्यात आले आहे आणि दिसायला अतिशय सुंदर आहे. बोईंग बीबीजे ७३७ मॅक्स ९ ची केबिन आधीच अतिशय सुंदर आणि एखाद्या राजवाड्यासारखी आहे. बोईंग बीबीजे ७३७ ८ च्या तुलनेत नवीन मॅक्स ९ मध्ये एक मोठी आणि प्रशस्त केबिन असून या विमानाचा चडछ क्रमांक ८४०१ आहे जो खासगी जेट एकावेळी सुमारे ११,७७० किमी अंतरापर्यंत उड्डाण करू शकते. तसेच या जेटच्या केबिनमध्ये अशी सर्व आरामदायी

## डोळ्यांचे मेगापिक्सेल



बाजारात दर महिन्याला नवीन स्मार्टफोन लाँच होत असतात. या स्मार्टफोनच्या कॅमेराचा दर्जा चांगला असतो. नवीन मोबाईल खरेदी करताना आपण कॅमेराचे मेगापिक्सेल प्रथम विचारात घेतो. कारण जास्त मेगापिक्सेलचा कॅमेरा चांगली फोटो क्वालिटी देतो. आपल्या डोळ्यांची क्षमता हे अशा कॅमेराच्या मेगापिक्सेलपेक्षा जास्त प्रभावी असते.


आपल्या डोळ्यात नैसर्गिक लेन्स असते. ही लेन्स कॅमेऱ्याप्रमाणे काम करते. ही लेन्स काचेची नाही तर नैसर्गिक असते. आपले डोळे म्हणजे डिजिटल कॅमेरा आहे असं मानलं, तर ते ५७६ मेगापिक्सेलपर्यंतचे दृश्य अगदी सहजपणे पाहू शकतात. याचा अर्थ आपल्या डोळ्यांच्या लेन्स ५७६ मेगापिक्सेल क्षमतेच्या असतात. वाढत्या वयानुसार डोळ्यांच्या क्षमतेवर परिणाम होतो का, असा प्रश्न तुमच्या मनात येईल. यावर हो असे उत्तर आहे. जसे वय वाढते तसे शरीराच्या इतर अवयवांप्रमाणे डोळ्यांचा रेटिना कमकुवत होऊ लागतो. याचा थेट परिणाम दिसण्याच्या क्षमतेवर होतो. तसेच यामुळे डोळ्यांच्या मेगापिक्सेल क्षमतेतदेखील बदल होतात.

**कॅमेऱ्याप्रमाणे माणसाचे डोळे काम करतात**

माणसाचे डोळे कॅमेऱ्याप्रमाणे काम करतात. यात प्रमुख तीन भाग असतात. लेन्स हा त्यापैकी पहिला भाग होय. लेन्स प्रकाश एकत्र करून फोटो तयार करतो. सेन्सर हा दुसरा भाग फोटोच्या प्रकाशाचे रूपांतर इलेक्ट्रिक सिग्नलमध्ये करतो. प्रोसेसर हा तिसरा महत्त्वाचा भाग असतो. यात इलेक्ट्रिक सिग्नलचे रूपांतर फोटोत करून पडद्यावर दाखवले जाते. डोळे एका वेळी ५७६ मेगापिक्सेलपर्यंत दृश्य पाहू शकतात. आपला मेंदू सर्व माहितीवर एका वेळी प्रक्रिया करू शकत नाही. तो केवळ काही भागांवर हाय डेफिनेशनमध्ये प्रक्रिया करतो. त्यामुळे कोणतेही दृश्य योग्य पद्धतीने पाहण्यासाठी आपल्याला डोळे त्या दिशेकडे फिरवावे लागतात किंवा त्यांची हालचाल दृश्यानुसार करावी लागते.



## हत्तींचे माहेरघर



हत्तीसारख्या बुद्धिमान आणि विशालकाय प्राण्याचे आकर्षण मानवाला आदिम काळापासूनच वाटत आलेले आहे. एकेकाळी पृथ्वीवर मॅमथ या नावाचे केसाळ हत्तीही वावरत होते. सध्या आफ्रिकन आणि आशियाई हत्ती जगात प्रसिद्ध आहेत. आफ्रिकन हत्ती हा जमिनीवरील सर्वात मोठ्या आकाराचा प्राणी आहे. आफ्रिका आणि आशिया हे दोन खंड हत्तींचा नैसर्गिक अधिवास बनलेले आहेत. आफ्रिकेत हत्ती सर्वाधिक संख्येने आढळतात. याठिकाणी हत्तींच्या विशेषतः दोन प्रजाती आढळतात. त्यामध्ये आफ्रिकन सवाना हत्ती आणि आफ्रिकन वर्षावन हत्ती यांचा समावेश होतो.

आफ्रिकन सवाना हत्ती सवानातील गवताच्या मैदानात आढळतात. त्यांचे विशाल कान आणि उंच पाठ ही ठळक वैशिष्ट्ये आहेत. आफ्रिकन वन हत्ती हे आफ्रिकेच्या वर्षावनांमध्ये राहतात. ते सवाना हत्तींच्या तुलनेत आकाराने लहान असतात आणि त्यांचे कान गोल असतात. हत्तींच्या संख्येबाबत आफ्रिकन देशांमध्ये बोत्सवानाचा क्रमांक अव्वल आहे. याठिकाणी लाखोंच्या संख्येत हत्ती आहेत. बोत्सवानाच्या सरकारने हत्तींच्या संरक्षणासाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली असल्याने त्यांची संख्या वाढली आहे. आफ्रिकेशिवाय आशिया हे हत्तींचे घर आहे. आशियाई हत्ती आकाराने आफ्रिकन हत्तींपेक्षा लहान असतात. त्यांचे कान छोटे आणि गोल असतात. आशियाई हत्तींची सर्वाधिक संख्या भारतात आढळते.



सध्या संपूर्ण जग अक्षय ऊर्जेच्या (रिन्यूएबल एनर्जी) वापरासाठी आग्रह धरत आहे. जास्तीत जास्त प्रमाणात अक्षय ऊर्जेचा वापर व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. भारतदेखील यासाठी प्रयत्न करत आहे. ग्रीन एनर्जी आणि इलेक्ट्रिक बॅटरी हे दोन घटक या बदलाच्या केंद्रस्थानी आहेत. अक्षय ऊर्जेच्या वापरामुळे एका विशिष्ट धातूची मागणी वाढण्याची शक्यता आहे. जस्त (झिंक) असे या धातूचे नाव आहे. इंटरनॅशनल झिंक असोसिएशनने याबाबत सविस्तर माहिती दिली. यानुसार, धातूसारखा दिसणारा हा दगड अगदी सोन्यासारखाच मौल्यवान आहे. ग्रीन एनर्जी आणि बॅटरी टेक्नॉलॉजीसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमुळे २०३०पर्यंत भारतातील झिंकच्या मागणीत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे, असेही यात नमूद केले गेले आहे.

## झिंकला सुवर्णझळाळी

### झिंकच्या वापरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ

झिंक असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, पुढच्या पाच वर्षांत एनर्जी स्टोरेज सोल्युशन्समध्ये सातपट वाढ होण्याची शक्यता आहे. जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारत या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये प्रगती करण्याचा प्रयत्न करत आहे. परिणामी झिंकच्या वापरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. भारतातल्या विक्रमी पोलाद उत्पादनासाठी आणि पायाभूत सुविधांच्या जलद गतीने होणाऱ्या विकासासाठी झिंक महत्त्वाचे आहे. त्यामुळे झिंकच्या किमतीत वाढ होण्याची संधी निर्माण झाली आहे. आयझेडएने सांगितलं, की इन्फ्रा प्रकल्पांमध्ये झिंकचा समावेश केल्यास ॲन्युअल कोरोजन कॉस्ट लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते. हा खर्च सध्या भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) सुमारे पाच टक्के आहे. एखादा उद्योग किंवा व्यक्ती त्याच्या उत्पादनांचे गंजापासून संरक्षण करण्यासाठी किंवा गंज कमी करण्यासाठी खर्च केलेल्या रकमेला करोजन कॉस्ट म्हणतात. धातूला गंज चढण्यापासून वाचवण्यासाठी केलेल्या उपायांकरिता आलेला खर्च आणि गंजाची किंमत यांचा त्यात समावेश होतो.



### झिंक फोटोव्होल्टाइक पेशींची कार्यक्षमता वाढवण्यास मदत

झिंक फोटोव्होल्टाइक पेशींची कार्यक्षमता वाढवण्यास मदत करते. सौर ऊर्जा प्रक्रियेतदेखील याचा उपयोग होतो. सोलर पॅनेलमध्ये वापरल्या जाणाऱ्या स्टीलवर झिंक कोटिंग केले जाते. यामुळे कोणत्याही नैसर्गिक परिस्थितीत उभ्या असलेल्या पॅनेलचे आयुष्य वाढते. झिंक वापरून बनवलेल्या बॅटरीची एनर्जी डेन्सिटी खूप जास्त असते. त्या मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाऊ शकतात. शिवाय अशा बॅटरीज स्वस्तदेखील आहेत. या बॅटरीमध्ये पवन आणि सौर ऊर्जा साठवता येते.

## देशातील पहिली इलेक्ट्रिक सुपरबाईक

सध्या जगभरात इलेक्ट्रिक वाहनांचा बोलबाला आहे. 'क्लिन एनर्जी'वर चालणाऱ्या या वाहनांमुळे प्रदूषण होत नाही. तसेच जीवाश्म इंधनदरवाढीच्या काळात ही वाहने लोकांना किफायतशीरही वाटतात. चारचाकी, दुचाकी वाहनांपासून चक्क विमानांपर्यंतही अशी वाहने बनवली जात आहेत. आता आपल्या देशात पहिली इलेक्ट्रिक सुपरबाईकही समोर आली आहे. देशातील पहिल्या सुपरबाईकचा मान 'अल्ट्राव्हायोलेट एफ' ला मिळाला आहे.

या बाईकचा कमाल वेग ताशी २६५ कि.मी. असा आहे. केवळ ३ सेकंदांत ही बाईक ताशी शून्य ते १०० किलोमीटरची गती गाठते. ही बाईक १२० बीएचपीची पॉवर जनरेट करेल. या बाईकचे वजन १७८ किलो आहे. 'अल्ट्राव्हायोलेट एफ' चे व्हीलबेस १४०० एमएमचे आहे. या कारची उंची १०५० एमएम इतकी आहे. बाईकला समोरून आणि मागील बाजूस १७ इंचाचे टायर देण्यात आले आहे. बॉडी कार्बन फायबरची आहे. ही बाईक भारतीय २ डब्ल्यू इंडस्ट्रीमध्ये अत्याधिक वेगाने धावणारी असल्याचा कंपनीचा दावा आहे. सध्या ही बाईक बाजारात दाखल झाली नाही. ती प्रोटोटाईपमध्ये समोर आली आहे. लवकरच ही बाईक बाजारात येईल. ती टॉप स्पीड देणारी एकमेव इलेक्ट्रिक बाईक ठरणार आहे. वेगाने क्वार्टर माईल पूर्ण करणारी ही भारतातील पहिली बाईक असेल. ही सुपरबाईक 'अल्ट्राव्हायोलेट एफ' च्या प्लॅटफॉर्मसाठी तयार करण्यात येणार आहे. 'अल्ट्राव्हायोलेट एफ' आधीच भारतीय बाजारात आलेली असून निवडक पाच शहरांमध्ये तिची विक्री होते.









जिल्हास्तरीय ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला.

# सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ध्वजदिन निधीसाठी मोलाचे योगदान द्या

## जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचा हस्ते ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन शुभारंभ

नगर – देशासाठी सीमेवर लढणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने ध्वजदिन निधीसाठी मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

जिल्हास्तरीय ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपविभागीय पोलीस अधिकारी संपतराव भोसले, श्री साईबाबा संस्थानचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप भोसले, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवाळ, कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्क्वॉड्रन लिडर वि.ल. कोरडे (निवृत्त) आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, जिल्ह्यात सैनिक आणि माजी सैनिकांची साधारण १४ हजार कुटुंबे आहेत. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ध्वजदिन निधी संकलन महत्वाचे आहे. यावर्षी २ कोटी ८० लाखाचे उद्दिष्ट असले तरी ६ कोटीचा निधी संकलित करण्याचे उद्दीष्ट ठेवून प्रत्येकाने यात भरीव योगदान द्यावे. प्रत्येक अधिकारी – कर्मचाऱ्याने एक दिवसाचा पगार ध्वजदिन निधीसाठी द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्याने गेल्यावर्षी विक्रमी संकलन केल्याबद्दल जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना धन्यवाद देत त्यांचे अभिनंदन केले आहे. सैनिकप्रती सद्‌भावना व्यक्त करण्यासाठी माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणाले.

पद्मश्री पवार म्हणाले, वीर जवान सीमेवर आणि किसान गावातील शेतात देशासाठी कार्य करतो. या दोघांवर देशाची जबाबदारी आहे. देशासाठी सीमेवर लढताना अनेक बांधवांना वीर मरण येते तर काहींना कायमचे अपंगत्व येते. अशा सैनिकांच्या कुटुंबियांना मदत करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यामुळे जिल्ह्यातून अधिकाधिक निधी संकलित व्हावा, यासाठी नागरिकांनी योगदान द्यावे आणि माजी सैनिकांना शक्य असेल तिथे सहकार्य करावे. पुढील वर्षी जिल्ह्यातील सरपंचांचे ध्वजदिन निधीला भरीव योगदान राहावे यासाठी आपण पुढाकार घेऊ, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात माजी सैनिक संघटनेच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रास्ताविकात श्री. कोरडे म्हणाले, भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण अर्पण केले, अशा जवानांच्या कुटुंबीयांच्या जीवनातील अडी–अडचणी दूर करून त्यांचे जीवन सुसह्य होण्यासाठी, युद्धात अपंगत्व तसेच सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनाकरिता सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन करण्यात येते. यात लोकसहभागाला महत्व आहे. सैनिकांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि नव्या पिढीत राष्ट्र प्रेमाची भावना निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम राबविला जातो. यावर्षी ५ कोटी ८ लाख रुपये अर्थात उद्दिष्टाच्या २७५ टक्के निधी संकलन करण्यात आले आणि २ कोटी १८ लाख रुपयांचा निधी माजी सैनिकांच्या कल्याणासाठी वापरण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शहीद जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. मनोहर नरहरी नातू यांच्यावतीने वीर पत्नी कौसल्या एकनाथ कर्डिले यांना १ लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. श्री.नातू यांनी सलग दहाव्या वर्षी असा निधी दिला आहे. यावेळी माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक कामगिरीबद्दल विशेष गौरव पुरस्कारांचे वितरणही करण्यात आले.

माजी सैनिक भाऊसाहेब रावजी पवार यांच्यातर्फे देण्यात येणारा १० हजाराचा निधी वीरपत्नी मिनाबाई भानुदास गायकवाड यांना धनादेशाद्वारे देण्यात आला. ध्वजदिन निधीसाठी १० हजार रुपये योगदान देणाऱ्या श्री रामकृष्ण क्षीरसागर महाराज आराधना भक्त मंडळ आणि २ लाख रुपये योगदान देणाऱ्या सन फार्मा प्रा.लि. चा यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार करण्यात आला. सीजी पॉवर संस्थेतर्फे सामाजिक दायित्व निधीतून सैनिकी मुलींच्या वसतिगृहासाठी २५ लाख रुपयाचे काम केल्याबद्दल संस्थेच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. माजी सैनिकांसाठी कार्य करणाऱ्या अक्षय टेमकर आणि ज्ञानदेव शेळके यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, माजी सैनिक, माजी सैनिकांचे कुटुंबीय, वीर पत्नी, वीर माता, वीर पिता आदी उपस्थित होते.

# 'गहना डायमंड व गोल्ड ज्वेलरी' एक्झिबिशनचे नगरमध्ये उद्‌घाटन

## पुण्यातील मोहिनी ब्राईडल ज्वेलर्सचे पारंपरिक व आधुनिक डिझाईनचे खास कलेक्शन



गहना डायमंड व गोल्ड ज्वेलरीचे एक्झिबिशनचे उद्‌घाटन करण्यात आले.

नगर – सरत्या वर्षाला मनपसंत सोने, डायमंड खरेदीने निरोप देण्यासाठी नगरमध्ये हॉटेल आयरिस येथे गहना डायमंड व गोल्ड ज्वेलरीचे एक्झिबिशन सुरू झाले आहे. १५ डिसेंबरपर्यंत सकाळी १०.३० ते रात्री ८ यावेळेत सदर विक्री प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. पुणे पिंपरी चिंचवड येथील मोहिनी ज्वेलर्स ब्रॅण्डचे खास कलेक्शन याठिकाणी आहे. मोहिनी ब्रॅण्ड प्रथमच नगर शहरात आपले खास कलेक्शन सादर करत आहे.

मोहिनी ज्वेलर्सचे करण दिलीप सोनिगरा यांनी सांगितले की, पुण्यातील चिंचवड येथे मोहिनी ब्रायडल ज्वेलर्स मागील ५० वर्षांपासून सुवर्ण सेवा देत आहे. ब्रायडल ज्वेलरीची मोठी आणि आकर्षक रेंज यात आहे. प्राचीन भारतीय कलाकुसरीची राजेशाही अँटिक ज्वेलरीची प्रत्येकालाच आवड असते. अशा खास कलाकुसरीच्या ज्वेलरीचे कलेक्शनही प्रदर्शनात आहे. राजस्थानी कारागीरांची खासियत असलेली जडाऊ ज्वेलरी, पोलकी ज्वेलरी नगरकरांना खरेदीचा सोनेरी आनंद देणारी ठरेल. पारंपारिक दागिन्यांबरोबरच आजच्या काळात कमी वजनाच्या दागिन्यांचा ट्रेंड आहे. त्याची सुद्धा मोठी व्हरायटी प्रदर्शनात असून चोखंदळ नगरकर या दागिन्यांना नक्कीच पसंती देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

'गहना'चे मन खेरगांवकर यांनी सांगितले की, राज्यातील तसेच देशातील नामांकित ब्रॅण्डचे दागिन्यांचे खास कलेक्शन नगरमध्येच उपलब्ध करून देण्यासाठी गहनाच्यावतीने नगर शहरात वेळोवेळी एक्झिबिशन घेण्यात येते. यंदा दिलीप सोनिगरा यांचा मोहिनी ब्रॅण्ड आपले खास दागिने प्रदर्शित केले आहेत. नगरकरांना त्यांच्या शहरात नामांकित ब्रॅण्डच्या सोने, डायमंड खरेदीचा आनंद मिळवून देताना विशेष आनंद होत आहे. नगरकरांनी या खास प्रदर्शनाला भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.शेवटी धर्मेश खेरगांवकर यांनी आभार मानले.

# अभिनेता अल्लू अर्जुनला पोलिसांनी केली अटक



हैदराबाद – पुष्पा २ चित्रपटाचा अभिनेता अल्लू अर्जुन याला संध्या थिएटरमध्ये ४ डिसेंबर रोजी झालेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली आहे. त्याला चिक्कडपल्ली पोलीस ठाण्यात चौकशीसाठी नेण्यात आले आहे. संध्या थिएटरमध्ये पुष्पा २ चित्रपटाच्या रिलीजदरम्यान मोठा जमाव एकत्र आला होता. यावेळी चेंगराचेंगरी होऊन एका महिलेचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले होते.

पोलिसांनी यापूर्वी संध्या थिएटरचे व्यवस्थापन, अभिनेता आणि त्याच्या सुरक्षा पथकाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. अधिकाऱ्यांनी नमूद केले की त्यांना कार्यक्रमात अभिनेत्याच्या उपस्थितीबद्दल आगाऊ माहिती देण्यात आली नव्हती. शुक्रवारी (दि.१३) चिक्कडपल्ली पोलिस स्टेशनच्या पथकाने त्याला राहत्या घरातून ताब्यात घेत अटक केली आहे.

# नगरच्या रसिकांना मिळणार सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी; विचार भारती व चैतन्य फौंडेशनची योजना

नगर – विचार भारती व सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या चैतन्य फौंडेशनच्या संयुक्त विद्यमाने रसिकांसाठी गाजलेल्या दिग्गज कलाकारांच्या दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांची एक अभिनव योजना सुरु केली आहे. या माध्यमातून वर्षातून किमान तीन गायनाचे अथवा सांस्कृतिक कार्यक्रमांची अनोखी मेजवानी नगरच्या रसिक श्रोत्यांना मिळणार आहे. यातील पहिल्या मैफलीचे आयोजन २३ डिसेंबर रोजी होणार असून गायिका प्रियांका बर्वे यांच्या सुश्राव्य गायनाचा आनंद रसिकांना मिळणार आहे, अशी माहिती विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी यांनी दिली.

सांस्कृतिक कार्यक्रमांच्या योजनेची अधिक माहिती देताना चैतन्य फौंडेशनचे अध्यक्ष अनंत देसाई म्हणाले, शहरातील सांकृतिक चळवळीला चालना मिळावी व रसिकांची सांस्कृतिक भूक भागावी यासाठी विचार भारती व चैतन्य फौंडेशनच्या वतीने ही अभिनव योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या सभासद नोंदणीस सुरवात झाली असून जास्तीत जास्त रसिक नगरकरांनी या योजनेत सहभागी व्हावे.

अधिक माहितीसाठी अरुण कुलकर्णी मो.नं ९४२२२३९००५, सुधीर लांडगे मो.नं. ९८२२०५९०१९, अनिल मोहिते ९४२२६१६२१० यांच्याशी संपर्क सधवा, असे आवाहन विचार भारती व चैतन्य फौंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# फिरोदिया शिवाजीयन्स ॲकॅडमीचा संघ महाराष्ट्र स्टेट युथ लीग स्पर्धेसाठी रवाना

## स्पर्धेत सहभागी होणारा जिल्ह्यातील पहिला संघ, शनिवारी पहिला सामना सिम्बियन्स स्पोर्ट्स अकॅडमी, मुंबई विरोधात



महाराष्ट्र स्टेट युथ लीगसाठी रवाना झालेला फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीचा १३ वर्षाखालील संघातील खेळाडू प्रशिक्षकांसमवेत.

नगर – वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित महाराष्ट्र स्टेट युथ लीग २०२४–२५ साठी शुक्रवारी (दि.१३ डिसेंबर) फिरोदिया शिवाजीयन्स अक्ॅडमीचा १३ वर्षा खालील फुटबॉलचा संघ लोणावळ्याला रवाना झाला आहे. या स्पर्धेमधून महाराष्ट्रातील २ सर्वोत्तम संघ राष्ट्रीय स्तरावरील ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन युथ लीगसाठी पात्र होणार आहे. स्पर्धे दरम्यान भारतातील नामांकित क्लब आणि अकॅडमीचे स्काउट्स खेळाडूंचे परीक्षण करणार आहेत.

लोणावळा (जि. पुणे) येथील सिंहगड विद्यापीठ येथे ही स्पर्धा पुढील ३ महिने चालणार आहे. महाराष्ट्र स्टेट युथ लीगसाठी फक्त ८ संघांना प्रवेश दिला जातो. प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील पहिला संघ म्हणून सहभागी होण्याचा ऐतिहासिक मान फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीला मिळाला आहे.

संघाचा पहिला सामना शनिवारी (दि.१४ डिसेंबर) सिम्बियन्स स्पोर्ट्स अक्ॅडमी, मुंबई विरोधात होणार आहे. शिवाजीयन्स स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष मनोज वाळवेकर आणि शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन ट्रस्टचे मुख्य विश्वस्त नरेंद्र फिरोदिया यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. संघ व्यवस्थापनात मुख्य प्रशिक्षक अभिषेक सोनावणे, सहाय्यक प्रशिक्षक जोनाथन जोसेफ, संघ व्यवस्थापक राजेश अँथोनी, फिजिओ डॉ. अर्शी बगदादी योगदान देत आहे.

पल्लवी सैंदाणे, जेव्हिअर स्वामी, सचिन पाथरे तसेच माजी खेळाडू आणि विद्यमान वरिष्ठ संघाच्या सदस्यांनी केलेल्या निस्वार्थ परिश्रमांमुळे संघ महाराष्ट्र स्टेट युथ लीगसाठी निवडला गेला आहे. हा ऐतिहासिक क्षण अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन, अहमदनगर कॉलेज, समर्पित खेळाडू आणि अहमदनगरच्या लोकांच्या पाठिंब्याशिवाय शक्य झाला नसता, अशी भावना नरेंद्र फिरोदिया यांनी व्यक्त केली आहे. संघाला प्रायोजकत्व देणारे आय लव्ह नगर आणि ग्रोथ एक्सचे खेळाडूंनी आभार मानले आहे.

फिरोदिया शिवाजीयन्स अक्ॅडमीचा १३ वर्षा खालील संघ पुढीलप्रमाणे –कर्णधार– सम्राट राजकुमार आव्हाड, उपकर्णधार– रंजन अमित वाघमारे, उपकर्णधार– झायन जावेद शेख, अजिंक्यराज प्रदीप अहिरे, आर्यन अनिल बोर्डे, आर्यन किरण जाधव, भार्गव शेखर साळुंखे, शौर्य महेश चंगेडिया, शौर्य संजय मोरे, वरद पंकज वाघ, वेदांत सुभाष बांगर, स्वराज शिवाजी जाधव.

# अण्णाभाऊ साठेंच्या स्मारकासाठी शासकीय जागा उपलब्ध करावी

## अखिल मातंग समाज चळवळीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



अण्णाभाऊ साठेंच्या स्मारकासाठी शासकीय जागा देण्यात यावी अशा मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना मातंग समाज बांधवांनी निवेदन दिले.

नगर – शोषित वंचिताच्या व्यथा आपल्या साहित्यात मांडणारे परिवर्तनवादी साहित्यिक, छत्रपती शिवरायांचा पोवाडा परदेशात जाऊन गाणारे, मराठी भाषेचा झेंडा साता समुद्रापार फडकवणारे, जगात सत्तावीस भाषेत ज्यांचे साहित्य प्रकाशित आहे असे लोकप्रबोधनकार डॉ. अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक पारनेर तालुक्यात उभारण्याकरिता शासकीय जागा मिळावी अशा मागणीचे निवेदन अखिल मातंग समाज चळवळ आणि मातंग समाज पारनेर यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले की तालुक्याच्या ठिकाणी अण्णा भाऊंचे स्मारक उभारावे असा समाजाचा मानस आहे. आजतगायत भरपूर प्रयत्न केले गेले परंतु महत्वाची बाब जागा नाही, आज जागेची किंमत आणि समाजाची आर्थिक परिस्थिती पाहता ते शक्य होत नाही. म्हणून समाजाच्या भावना लक्षात घेऊन स्मारकासाठी शासकीय जागा मिळावी यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.

सदर निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या सह तहसीलदार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तलाठी कार्यालय येथे देण्यात आली. याप्रसंगी संतोष शेलार, रामदास साळवे, सतिश साळवे, सुनील संकट, विशाल साळवे, अविनाश उमाप, अशोक ठोंबरे, अमोल गायकवाड, संजय शेलार, राजेंद्र आल्हाट, राजेंद्र अवचिते, रामदास वायदंडे, सरोदेताई, महादु मैंगाळ, बबन शेलार, राजु वैराळ, विकास शेलार, गणेश राजहंस आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते.


# धाराशिव जिल्हयातील बलात्काराच्या गुन्हयातील आरोपीला नगरमध्ये पकडले

नगर – धाराशिव जिल्ह्यातील आंबी पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल असलेल्या फरार आरोपीला नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर शहरातील मार्केट यार्ड परिसरात पकडले आहे. सुनिल बिभीषण शेंडकर, (रा.अंतरवली, ता. भुम, जि.धाराशिव) असे या आरोपीचे नाव आहे.

आरोपी शेंडकर हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. आंबी पोलिसांनी नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेला माहिती कळवून सदर आरोपी नगर शहर परिसरात आढळल्यास त्याला पकडण्यास सांगितले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार संदीप पवार, शरद बुधवंत, संतोष खैरे, विजय ठोंबरे व आकाश काळे यांचे पथक आरोपीचा शोध घेत असताना, पथकास आरोपी सुनिल शेंडकर हा नगर शहरातील मार्केटयार्ड परिसरामध्ये असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने मार्केटयार्ड परिसरामध्ये जाऊन पाहिजे आरोपीचा शोध घेतला असता तो मिळून आला. त्यास ताब्यात घेतले.

तसेच पुढील कार्यवाहीसाठी आंबी पोलीस स्टेशन, ता.भुम, जि.धाराशिव येथील पोलीस अधिकारी यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

# कत्तलखान्यावर छापा टाकत १८ गोवंशीय जनावरांची सुटका; तिघांवर गुन्हा दाखल



बाबा बंगाली चौका जवळील कत्तलखान्यातून सुटका केलेल्या गोवंशीय जनावरांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंश जनावरांची कत्तल करण्यास मनाई असताना गोवंशीय जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने डांबून ठेवलेल्या कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी छापा टाकून १८ गोवंशीय जनावरांची सुटका केली. ही कारवाई बाबा बंगाली चौकाजवळील सरकारी शौचालयाच्या शेजारील पत्राच्या शेडमध्ये गुरुवारी (दि.१२) सायंकाळी सहा वाजता केली.

या बाबतची माहिती अशी की पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक नगर शहरामध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असताना त्यांना बाबा बंगाली चौक, झेंडीगेट या ठिकाणी फैजान कुरेशी, सुफियान कुरेशी, शोएब कुरेशी (सर्व रा. झेंडीगेट अ.नगर) यांनी गोवंश जातीचे जिवंत जनावरे कत्तल करण्याचे उद्देशान आणुन त्यांना विना चारापाण्याचे निर्दयतेने बाबा बंगाली चौकी जवळील सरकारी शौचालयाचे शेजारी एका पत्र्याचे शेडमध्ये डांबुन ठेवले असल्याची माहिती मिळाली. ही महिती मिळताच पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी पत्र्याचे शेडजवळून तीन इसम पोलिसांना पाहून गल्ली बोळातुन पळुन गेले.

त्या ठिकाणी असलेल्या पत्र्याचे शेडची पाहणी केली असता शेडमध्ये गोवंश जनावरे दाटीवाटीने विना चारापाण्याचे निर्दयपणे बांधुन व डांबुन ठेवले असल्याचे दिसुन आले. पोलिसांनी आजुबाजुस पळुन गेलेल्या इसमांचे नाव विचारता त्यांची नावे फैजान इद्रिस कुरेशी, सुफीयान उर्फ गूल्लू इद्रिस कुरेशी, शोएब अब्दुल रऊफ कुरेशी (सर्व रा. झेंडीगेट अ.नगर) असे असल्याचे समजले. तसेच ही जनावरे पळून गेलेल्या इसमांनी कत्तलीसाठी आणले असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी या ठिकाणी ७ लाख ५० हजार रुपये किमतीचे काळे, पांढरे व तांबडे रंगाचे एकुण १५ मोठी जनावरे (गायी), ६० हजार रुपये किमतीचे काळे, पांढरे व तांबडे रंगाचे एकुण ३ लहान वासरे असा सुमारे ८ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल रविंद्र घुंगासे यांच्या फिर्यादीवरुन तिघाविरुध्द महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम सन १९९५ चे सुधारीत २०१५ चे कलम ५ (अ), ५ (ब), ९ सह प्राण्यांना निर्दयतेने वागवण्याचे कलम ३. ३, ११ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली. ही कारवाई पोलिस अंमलदार पंकज व्यवहारे, संदीप पवार, विजय ठोंबरे, शिवाजी ढाकणे, आकाश राजेंद्र काळे, रवींद्र घुंगासे यांनी केली.

